रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌ आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022) ॥ वर्ष ८५ ॥ अंक २३६ ॥ पृष्ठे ८+४ www.krushival.in




# कृषीवल

रायगड ॥ बुधवार, दिनांक २ फेब्रुवारी २०२२

किंमत ४ ₹

अभ्युदय को-ऑप. बँक लि. (मल्टी - स्टेट शेड्युल्ड बँक)
आपली बँक
गृह कर्ज 6.70%* (प्रति वर्ष)
प्रक्रिया शुल्कात ६०% सवलत
प्रजासत्ताक 73 मुदत ठेव योजना

| योजना | सामान्य नागरिकांसाठी | ज्येष्ठ नागरिकांसाठी | कालावधी |
|---|---|---|---|
| QICRIP | 5.50% | 5.75% | 18 महिने |
| QID | 5.60% | 5.85% | |

योजना मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध
अधिक माहितीसाठी लॉग ऑन करा www.abhyudayabank.co.in
टोल फ्री : 1800-22-3131



# अपेक्षाभंग...

**मध्यमवर्गीयांना ठेंगा, कॉर्पोरेट क्षेत्राला 'रेड कार्पेट'** | **इन्कम टॅक्स 'जैसे थे', नोकरदारांची निराशा** | **हमी भावाबाबत मोदी सरकारचे मौनव्रत**

*। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।*

*नोकरदार, मध्यमवर्गीयांना ठेंगा, कार्पोरेट क्षेत्रासाठी रेड कार्पेट टाकत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी मंगळवारी देशाचा अर्थसंकल्प सादर केला खरा, पण या अर्थसंकल्पाने सर्वांचाच अपेक्षाभंग झाल्याचे प्रकर्षाने दिसून आले. गेले दोन वर्षे कोरोना साथीत भरडलेल्या सर्वसामान्यांना अर्थसंकल्पातून दिलासा मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र कोणत्याही प्रकारचा ठोस दिलासा मिळाला नाही. उलट इन्कम टॅक्समध्ये कुठल्याही प्रकारचा बदल करण्यात न आल्याने देशातील समस्त नोकरदार वर्ग कमालीचा नाराज झाला आहे. तर हमी भावाची हमीच सरकारने न दिल्याने शेतकरी वर्गही कमालीचा संतप्त झालेला आहे. याशिवाय उद्योग, पायाभूत सुविधांसाठी पूर्वीच्याच घोषणांचा पुनरुच्चार करुन अर्थमंत्र्यांनी सर्वांचीच घोर निराशा केली असल्याचे दिसून आले. या बजेटचा शेअर बाजारात मात्र चांगला परिणाम दिसून आला. कंपनी कराचे प्रमाण १८ वरुन १५ टक्क्यांपर्यंत कमी करुन उद्योगपतींना खुश केले आहे.*

दुसऱ्या बाजुला देशात डिजिटल चलन आणण्यात येईल अशी घोषणा केली. याचबरोबरच कृषी, बांधकाम, शिक्षण, पायाभूत सुविधा क्षेत्राबाबतही कोणत्याही प्रकारच्या ठोस घोषणा न झाल्याने या क्षेत्रातूनही नाराजी व्यक्त केली जात आहे. यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्प २०२२ मध्ये कररचनेत कोणताही बदल न करून सामान्य करदात्यांच्या पान २ वर

## *नाबार्डमार्फत स्टार्टअपना मदत*

*अर्थसंकल्पात नाबार्डच्या माध्यमातून स्टार्टअपना मदत करण्याची घोषणा केली आहे. १९८१ च्या कायद्यानुसार नाबार्ड २० लाख रुपयांपर्यंतची गुंतवणूक असलेल्या उद्योजकांना यंत्रसामग्री व वनस्पतींसाठी कर्ज आणि इतर सुविधा देते. सुधारित कायद्यात उत्पादन क्षेत्रातील १० कोटी आणि सेवा क्षेत्रातील ५ कोटी रुपयांपर्यंतच्या गुंतवणूकीचा समावेश आहे. याच अंतर्गत आता स्टार्टअपच्या वित्त पुरवठा केला जाणार आहे. या माध्यमातून ग्रामीण भागात स्टार्टअपना आपला उद्योग उभारायला मदत होणार आहे.*

## अर्थसंकल्प २०२२-२३

## इन्कम टॅक्समध्ये बदल नाही

यंदाचे प्राप्तीकर संकलन हे २०२० च्या अर्थसंकल्पामध्ये जाहीर केलेल्या रचनेप्रमाणेच असेल. सामान्य करदात्याला आयकरात सवलत मिळून आता ८ वर्ष झाली आहेत. मोदी सरकारने २०१४ साली आयकराची मर्यादा २ लाखावरून वाढवून ती २.५ लाख केली होती.

### नवीन करप्रणाली

- ५ लाखांपर्यंत कर मुक्त
- ५ ते ७.५ लाख- १० टक्के
- ७.५ ते १० लाख- १५ टक्के
- १० ते १२.५ लाख-२० टक्के
- १२.५ ते १५ लाख २५ टक्के
- १५ लाखांपुढे ३० टक्के

### स्वस्त

कापड, चामड्याच्या वस्तू, मोबाइल, फोन चार्जर, चप्पल आणि हिऱ्यांचे दागिने, शेतीची साधनं आणि परदेशातून येणाऱ्या वस्तू



### महाग

क्रिप्टो करन्सीमधील गुंतवणूक, छत्र्या, आयात होणाऱ्या सव वस्तू



### राज्य सरकारांना १ लाख कोटी

अर्थसंकल्पाच्या भाषणात निर्मला सीतारमण यांनी देशातील सर्व राज्य सरकारांसाठी एक मोठी घोषणा केली आहे. राज्य सरकारांच्या मदतीसाठी केंद्र १ लाख कोटी रुपये दिले जाणार आहेत. ही रक्कम ५० वर्षासाठी बिगर व्याजी असणार आहे. याचा फायदा देशातील सर्वच राज्यांना होणार असल्याचा दावा अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणातून केला आहे.



शंभर वर्षातील सर्वात भयंकर संकटाला सामोरे जात असताना हा अर्थसंकल्प विकासाचा नवा विश्वास घेऊन आला आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेला अधिक बळकटी देणारा हा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पात सर्वच घटकांचा विचार करण्यात आला असून अनेक नव्या संधींची कवाडे या माध्यमातून खुली होणार आहेत, गरिबवर्गाचे कल्याण हा अर्थसंकल्पातील सर्वात मोठा संकल्प अर्थमंत्र्यांनी मांडला आहे.

– नरेंद्र मोदी, पंतप्रधान

देशात एक डिजिटल युनिव्हर्सिटीची स्थापना केली जाणार आहे.

देशभरातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचं शिक्षण अगदी व्यक्तिगत स्वरुपाच्या शिक्षण अनुभवाची अनुभूती करून देण्यासाठी उपलब्ध करण्यात येणार आहे. नेटवर्क हब अँड स्पोक मॉडेलवर ही डिजिटल युनिव्हर्सिटी काम करेल, असा विश्वास आहे.

– निर्मला सीतारमण, अर्थमंत्री



केंद्रीय अर्थसंकल्पातून काही ठोस उत्तरे मिळतील अशी अपेक्षा होती परंतु लोकमनातील ही अस्वस्थता केंद्र सरकारपर्यंत पोहोचलेलीच दिसत नाही. त्यामुळे हा अर्थसंकल्प नोकरदारांसह सर्वसामान्यांच्या अपेक्षांचा भंग करतो. याआधीच्या अर्थसंकल्पातून केंद्र सरकारने सर्वसामान्य जनतेपुढे अनेक स्वप्नं उभी करून त्यांच्यात आशावाद निर्माण केला, प्रत्यक्षात यातील किती स्वप्नं पूर्ण झाली याची स्पष्टता न करता आणखी नवीन स्वप्ने २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातून लोकांसमोर मांडण्यात आली आहेत.

– उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री

# नितेश राणे यांना पुन्हा दणका

**॥ नियमित जामीनही नामंजूर**

**॥ पोलिसांसमवेत बाचाबाची**

। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।

शिवसेना कार्यकर्ते संतोष परब हल्ला प्रकरणी सिंधुदुर्ग जिल्हा न्यायालयानं भाजप आमदार नितेश राणे यांचा नियमित जामीन अर्ज नामंजूर केला आहे. त्यावरुन आता राणे यांना अटक होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. मात्र, यावरुन राणे समर्थक आणि पोलिसांमध्ये जोरदार बाचाबाची झाली.

न्यायालयातून बाहेर पडत असतानाच नितेश राणे यांची गाडी पोलिसांनी अडवली. न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्यानंतर ते जात असताना पोलिसांनी त्यांच्यासमोर आपल्या गाड्या लावल्या आहेत. यामुळे माजी खासदार निलेश राणे आक्रमक होत थांबविण्याचे आदेश दाखवा, अशी त्यांनी मागणी केली आहे. कुठल्या अधिकाराखाली थांबवलं, असं निलेश राणेंनी म्हटलं आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयानं दहा दिवसांची मुदत दिली आहे. त्यापूर्वी नितेश राणेंना अटक करता येणार नाही, असं सरकारी वकिलांनी सांगितलं आहे.

आयुर्वेदिक खो-गो'®
60 YEARS OF TRUST
कफ-पिल्स
खोकल्यावर अत्यंत गुणकारी गोळ्या
Trial Pack ₹10/-
कोरडा खोकला
घशातील खवखव
घसा दुखणे
ह्यावर गुणकारी
सर्व केमिस्टमध्ये उपलब्ध
कफ सुटून घशाला त्वरीत आराम मिळतो.
अहिल्या आयुर्वेदिक औषधालय, मुंबई ६३.
HelpLine No: +91 8108130009 • www.khogo.in


रिझर्व्ह बँक - एकात्मिक लोकपाल योजना
आरबीआय विनियमित संस्थांच्या विरुद्ध तक्रारींच्या निवारणासाठी एकल सुविधा
30 दिवसांच्या आत तक्रारींचे निवारण न झाल्यास किंवा आरबीआय द्वारा विनियमित बँका/एनबीएफसी/प्रणाली भागीदाराच्यां द्वारा समाधानकारक निवारण न झाल्यास तुम्ही त्यांची तक्रार लोकपालांकडे (ऑम्बड्समॅन) दाखल करू शकता
तक्रारी https://cms.rbi.org.in येथे ऑनलाइन किंवा crpc@rbi.org.in येथे ईमेल द्वारा किंवा केंद्रीकृत पावती प्रसंस्करण केंद्र, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, चंडीगढ – 160017 येथे पोस्टाने दाखल करा
अपवर्जन सूचीतील तक्रारींच्या व्यतिरिक्त, सेवांमधील कमतरतांच्या संबंधांतील सर्व तक्रारींचा समावेश
तुमच्या तक्रारीची सद्यस्थिती तक्रार व्यवस्थापन प्रणाली (https://cms.rbi.org.in) वर बघा
अधिक माहितीसाठी 14448 ला कॉल करा. तक्रार दाखल करण्यासाठी, https://cms.rbi.org.in वर जा
आरबीआय सांगते आहे... जाणकार बना, सतर्क रहा!
अधिक माहितीसाठी, https://rbikehtahai.rbi.org.in/ वर जा
फीडबॅक देण्यासाठी, rbikehtahai@rbi.org.in ला लिहा
सार्वजनिक हितार्थ जारी
भारतीय रिझर्व्ह बँक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

## अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**२ फेब्रुवारी**

१) श्रीम. शारदा पाटील
पोयनाड, अलिबाग
०२-०२-१९४२
२) श्री. गजानन कुंडे
चेंढरे-अलिबाग
०२-०२-१९५६
३) श्री.सुभाष कर्वे
चेंढरे-अलिबाग
०२-०२-१९४६

## कोयनानगर परिसरात भूकंपाचा सौम्य धक्का

**सातारा :** सातारा जिल्ह्यात कोयनानगर परिसराला मंगळवारी (१ फेब्रुवारी) सकाळी ९ वाजून ४७ मिनिटांनी भूकंपाचा सौम्य धक्का जाणवला. कराड येथील भूकंपमापन केंद्रावर या भूकंपाची नोंद ३..३ रिश्टर स्केल तीव्रतेची झाली. त्याची नोंद २.९ रिश्टर स्केल अशी झाली.

### पेणच्या 'त्या' आरोपीचे

# पुन्हा पलायन नाट्य

### जिल्हा कारागृहाच्या ३५ फूट दगडी तटबंदीवरून मारली उडी


**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

पेण पोलीस कोठडीतून पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पळालेला आरोपी बिरू महतो याने अलिबाग जिल्हा कारागृहातूनही ३५ फूट दगडी तटबंदीवरून पळून जाण्याचा पुन्हा प्रयत्न केला मात्र तोही असफल झाला आहे. दगडी भिंतीवरून उडी मारल्याने त्याच्या पाय फ्रॅक्चर झाला आहे. अलिबाग पोलिसांनी दहा मिनिटात आरोपी बिरू याचा शोध घेऊन अटक केली. याबाबत अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सोमवारी ३१ जानेवारी रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

### अलिबाग पोलिसांकडून दहा मिनिटात अटक

पेण पोलीस ठाण्यातील कोठडीत हाफ मर्डरबाबत बिरू महतो अटक होता. ३० जानेवारी रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी बिरू याला शौचालयाला बाहेर काढले. यावेळी बिरू याने पोलिसांची नजर चुकवून बाजूच्या भिंतीवरून पलायन केले. या प्रकाराने पोलिसांची धावपळ सुरू झाली. अखेर बारा तासानी आरोपीला पकडण्यात पोलिसांना यश आले. त्यानंतर आरोपीची पोलीस कोठडी संपली असल्याने ३१ जानेवारी रोजी पेण न्यायालयात हजर केले. न्यायालयाने आरोपीला न्यायालयीन कोठडी सुनावल्याने आरोपीला अलिबाग येथील जिल्हा कारागृहात आणले.

जिल्हा कारागृहात सायंकाळी सात वाजता आणले असता कारागृह अंमलदाराला धक्का देऊन आरोपी बिरू याने कारागृहाच्या ३५ फूट दगडी तटबंदीवरून उडी मारून पलायन केले. त्यामुळे कारागृहात खळबळ माजली. कारागृह पोलीस प्रशासनाने तातडीने याबाबतची वर्दी अलिबाग पोलिसांना दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन अलिबाग पोलिसांनी तात्काळ कोंबिंग ऑपरेशन सुरु केले. कारागृहालगतच्या परिसराची झाडाझडती सुरु करण्यात आली. दहा मिनटातच एका घरामागील सरपण ठेवण्याच्या जागेत तो लपलेला आढळून आला. या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात आरोपी बिरू महतो याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक शैलेश सणस करत आहेत.या चोरट्याच्या पलायन नाट्याची सर्वत्र चर्चा सुरु होती.




## हमी भाव कायदा झाला तरच बळीराजा सुखावेल

### टिकैत यांची नाराजी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

*केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामनयांनी देशाचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पातून शेतकऱ्यांसाठी मोठ्या घोषणा करण्यात आल्या.मात्र त्यावर शेतकरी संघटनांचे नेते राकेश टिकैत यांनी नाराजी व्यक्त केली आहे. एमएसपी हमी कायदा होत नाही तोपर्यंत शेतकऱ्यांना कुठलाही फायदा होणार नाही. एमएसपी हमी कायदा झाल्यावर शेतकऱ्यांना लाभ मिळेल, असं राकेश टिकैत म्हणाले.*

### महाराष्ट्रावर अन्यायाची परंपरा

देशाला कररुपानं सर्वाधिक महसूल देणाऱ्या महाराष्ट्रावर अन्याय करण्याची परंपरा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या अर्थसंकल्पातही कायम राखली. केंद्रानं चालू आर्थिक वर्षात एकूण २ लाख २० हजार कोटींचा एकूण केंद्रीय जीएसटी वसूल केला. त्यातले तब्बल ४८ हजार कोटी महाराष्ट्रातून वसूल करण्यात आले. या केंद्रीय जीएसटीच्या बदल्यात महाराष्ट्राला अवघे साडेपाच हजार कोटी रुपये परत मिळाले. निधीवाटपातल्या या अन्यायाचं प्रतिबिंब यंदाच्या अर्थसंकल्पातही स्पष्टपणे दिसत असून अर्थसंकल्पातून महाराष्ट्राच्या वाट्याला काय आलं ते शोधूनही सापडत नाही.केंद्राने थोडीतरी सहानुभूती दाखवावी.

– अजित पवार, उपमुख्यमंत्री

### निराशाजनक

केंद्राच बजेट हे घोर निराशा करणारे आहे. आकड्याचा खेळ करीत स्वतःच कर्तृत्व दाखविण्याचा केविलवाणा प्रयत्न केंद्रीय सरकारने केलेला आहे. ग्रामसडक योजनेतून तीन वर्षात राज्यात एक इंचही काम नाही.

– सुनील तटकरे, खासदार

### परकीय चलन वाचणार

संरक्षण शस्त्र निर्मितीमधील ६८ टक्के निधी हा देशांतर्गत शस्त्र निर्मितीसाठी वापरला जाणार असल्याने मोठ्या प्रमाणात परकीय चलन वाचणार आहे. भविष्यामध्ये भारत संरक्षण क्षेत्रामध्ये शस्त्र निर्यात करु शकतो.

– देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते

### झिरो सम बजेट -राहूल

पगारादरांना काही मिळालं नाही, मध्यमवर्गाला काही मिळालं नाही, गरीब आणि दबलेल्या लोकांसाठी काही नाही, तरुण, शेतकरी आणि सूक्ष्म आणि लघू उद्योगांना काही मिळालं नाही.

– राहुल गांधी, काँग्रेस नेते

### आभासी पतंग

आकाशात आभासी पतंग उडवत अर्थमंत्र्यांनी सादर केलेला शब्दबंबाळ अर्थसंकल्प सामान्य नागरिकांसाठी अमृतकाळ देणारा नसून अधिक गरिबीकडे ढकलणारा, आहे. आंदोलनानंतर सुद्धा ही अन्नदात्यांची वंचना असेल तर हे सरकार अत्यंत मुर्दाड आणि कॉर्पोरेट शक्तींना शरण जाणारे आहे. –उल्का महाजन, सामाजिक कार्यकर्त्या

### पायाभूत सुविधांना गती

संसदेत सादर केलेले अंदाजपत्रक देशातील आधुनिक पायाभूत सुविधांच्या वाढीला गती देणारे आहे. हे अंदाजपत्रक १३० कोटी भारतीयांचे जीवन अधिक सुसह्य करणारे आहे, विकासासाठी पायाभूत सुविधांचा विकास अत्यंत आवश्यक आहे. पायाभूत सुविधांवर करण्यात येत असलेली गुंतवणूक ही मैलाचा दगड असल्याचे सिध्द होईल. – नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री

### डोंगर पोखरून उंदीर निघाला

जानेवारीत १ लाख ४० हजार कोटींची जीएसटी जमा झाला, राज्य सरकारांना परतावा कधी मिळणार, जे उद्योग आहेत ते विकून टाकत आहेत, त्यामुळे हे राज्यकर्ते युवकांना रोजगार कसा देणार.

– छगन भुजबळ, मंत्री

## विहुर रौदं येथे ड्रोन कॅमेऱ्यातून शूटिंग

**। मुरुड । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील विहुर ग्राम पंचायत हद्दीतील खेळाचे रौदं नामक मैदानावर जिल्हाधिकारी यांची समुद्र किनारी ड्रोन उडविण्यास बंदी असतांना देखील रविवारी (३० जानेवारी ) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास ड्रोन कमेराद्वारे शूटिंग करणाऱ्या विरोधात मुरुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतची तक्रार पोलीस नाईक परेश म्हात्रे यांनी दिली आहे.

विहुर ग्राम पंचायत हद्दीतील हद्दीतील रौदं हे खेळाचे मोठे मैदानावर समुद्र किनारी ड्रोन उडविण्यास बंदी असतांना देखील सरफराज मोहमद सईद सय्यद,रा, नागोठणे टक्का मोहल्ला, व अल्लादिन

### आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

फैयाज मोबिन,रा.बेलसे, ता-पेण, यांनी हे चित्रीकरण केले होते. विहूर रौद हा परिसरातील मोठी जागा एका खाजगी मालकाने विकत घेतली असून सध्या ही खाजगी मालमत्ता झाली आहे. त्यामुळे खाजगी मालकीचे चित्रीकरण झाल्याने सध्या हा वाद चांगलाच रंगला आहे. विहूर ग्रामस्थ व खाजगी मालक यांच्यात सध्या मोठा वाद सुरु आहे.यातच मालकाची परवानगी न घेता ड्रोनद्वारे चित्रीकरण केल्याने मोठा वाद निर्माण होऊन ड्रॉनद्वारे शूटिंग करणाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कोर्ट कमिशनकडून महामार्ग पाहणी दौरा

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

महामार्गाच्या दुरवस्थेबाबत अलिबागमधील सामाजिक कार्यकर्ते ॲड.अजय उपाध्ये यांनी सादर केलेल्या याचिकेनुसार न्यायालयाने मुंबई गोवा महामार्गाची पाहणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश जारी केले असून,यासाठी तज्ञ अभियंता पी एन पाडळीकर यांची कोर्ट कमिशन म्हणून नियुक्ती न्यायालयाने केली आहे. त्यानुसार १ फेब्रुवारी पासून पळस्पे ते माणगाव या मार्गाचा पाहणी दौरा सुरू आहे. बुधवारी माणगाव ते पोलादपूर पर्यत पाहणी केली जाणार आहे. स्पीडब्रेकरमुळे वाहने जम्प करीत असल्याचे दिसून आले आहे. तसेच योग्य पद्धतीच्या ठिकाणची माहितीही देण्यात आलेली नाही. असे प्रथम दर्शनी दिसून आले.

## रायगडातील निर्बंध शिथिल

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाचे आजपासून सुधारीत आदेश लागू केले आहे. राज्य सरकारच्या या आदेशाचा रायगडसह ११ जिल्ह्यांना फायदा होणार आहे.यामध्ये मुंबई, पुणे, भंडारा,गोंदिया, चंद्रपूर, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सातारा, सांगली. कोल्हापूर या जिल्ह्यांचा समावेश आहे.

ज्या जिल्ह्यांमध्ये पहिल्या डोसचे ९० टक्के आणि दुसर्या डोस घेणार्यांचे ७० टक्के लसीकरण झाले आहे. तसेच याशिवाय १५ ते १८ वयोगटातील मुलांचे राज्य सरकारच्या निर्देशाप्रमाणे लसीकरण झाले आहे, अशा जिल्ह्यांमधील कोरोना निर्बंध शिथिल करण्यात आले आहेत. रायगडातील निर्बंध यामुळे शिथिल होणार आहेत.

**काय सुरु होणार?**

- ▶▶।चौपाटी, गार्डन, सर्व राष्ट्रीय पार्क आणि सफारी
- ▶▶।पर्यटन स्थळ पुन्हा सुरू होणार ऑन लाईन तिकीट बुकिंग होणार
- ▶▶।स्विमिंग पूल,वॉटर पार्क ५० टक्के क्षमतेनं सुरु
- ▶▶।हॉटेल,थिएटर ५० टक्के क्षमतेनं सुरु राहणार
- ▶▶।सलून, स्पा ५० टक्के क्षमतेनं सुरु
- ▶▶।लग्नासाठी २०० जणांना परवानगी
- ▶▶।भजन आणि सांस्कृतिक कार्यक्रम ५० टक्के उपस्थिती
- ▶▶।खेळाच्या स्पर्धा लोकांची २५ टक्के उपस्थिती
- ▶▶।नाईट कर्फ्यू रात्री ११ ते सकाळी ५
- ▶▶।अंत्यविधीसाठी कोणतीही मर्यादा आली
- ▶▶। सर्व कार्यक्रमांना ५० टक्के क्षमतेनं परवानगी
- ▶▶। स्थानिक प्रशासनाच्या वेळेनुसार बीचेस, गार्डन, पार्क खुली होणार
- ▶▶। वॉटर पार्क, स्विमिंग पूल ५० टक्के उपस्थिती
- ▶▶। रेस्टॉरंट, थिएटर, नाट्यगृह ५० टक्के उपस्थिती.

# युसुफ मेहेरअली सेंटर करणार वेलटवाडीचे पुनर्वसन

## डॉ. जी. जी. पारिख यांची माहिती

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

जून २०२० मधील अतिवृष्टीमध्ये भूस्खंलनामुळे विस्थापित झालेल्या अलिबाग तालुक्यातील खानाव-वेलटवाडी येथील २३ आदिवासी कुटुंबांचे तारा येथील युसुफ मेहेरअली सेंटरच्या माध्यमातून नियोजनबद्ध पद्धतीने पुनर्वसन करण्यात येणार आहे. सेंटरचे संस्थापक व स्वांतंत्र्यसैनिक डॉ. जी. जी. पारिख यांनी यासंदर्भात मंगळवारी येथे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांची भेट घेतली. या बैठकीत जिल्हा प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याचे डॉ पारिख यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

अलिबाग तालुक्यातील खानाव ग्रामपंचायत हद्दीतील वेलटवाडी येथे जून २०२० मध्ये झालेल्या निसर्गचक्री वादळामुळे येथील डोंगरावर असलेल्या २३ आदिवासींच्या घरांची पडझड झाली. त्यामुळे तिथे आदिवासींना राहणे कठीण होते म्हणून जिल्हाधिका-यांचे आदेशानुसार अलिबाग तहसिलदार यांनी तातडीने पत्राशेड बांधून राहाण्याची व्यवस्था केली होती. तर खानाव ग्रामपंचायतीने स्वखर्चाने डोंगरातून पाईप लाईन द्वारा पाण्याची व्यवस्था केली होती. हे आदिवासी बांधव शेडच्या बाजूच्या वन जमिनीवर कच्ची झोपडी बांधून राहू लागले होते. ग्रामस्थ म्हणून ग्रामपंचयतीनेही त्यांना सहकार्य केले. परंतु वन विभागाने वन कायदा नियम शर्तीने नोटीस बजावून व अनेकदा तोंडी सांगून आदिवासींना सदर जागा सोडण्यास सांगितले आहे. त्यामुळे सदर २३ कुटुंबांची परवड झाली आहे. कुटुंबाची जबाबदारी म्हणून त्यांना मजुरीसाठी भटकावे लागते. अशावेळी या आदिवासींच्या लहान मुलांची हेळसांड होत आहे. त्यामुळे वेलटवाडी येथील आपत्तीग्रस्त



आदिवासी बांधवांसमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

सदर २३ कुटुंबे व त्यांच्या वाढीव कुटुंबियांच्या पुनर्वसनासाठी समाज मंदिर, बालवाडीसह पर्यायी जागा द्यावी. आहे त्याच जागेवर पुनर्वसन व्हावे. अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी नियम २००६-२००८ सुधारणा नियम १२ मधील कलम ३ पोट कलम २ अन्वेय पुनर्वसन करावे. संबंधित सर्व आदिवासींचे पुनर्वसन होत नाही तोपर्यंत सदर जागेवरुन आदिवासींना हुसकावण्याचा प्रयत्न होऊ नये. संबंधित वन अधिकारी कर्मचारी यांना त्याबाबत प्रतिबंध करावा. सदर आदिवासींना सनद देवून ते लागवडीत आणीत असलेल्या जमिनीची शासकीय पातळीवर नोंद करुन दखल घेतली आहे. सदर सनद प्राप्त जमिनी सातबारावर नोंद करुन त्यांना भोगवटदार करण्यासाठीची प्रक्रिया करण्यासाठी तहसिलदार अलिबाग यांना आदेश द्यावेत. या मागण्या डॉ. पारिख यांनी जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्यासमोर मांडल्या.

जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी वेलटवाडी आदिवासींच्या पुनर्वसनाचा प्रश्न येत्या आठ दिवसांत सोडविण्याचे आश्वासन दिले आहे. वेलटवाडीतील आदिवासींचे नियोजनबद्ध पुनर्वसन व्हावे यासाठी युसुफ मेहेरअली सेंटरच्या माध्यमातून काम करण्यात येईल, अशी माहिती डॉ. जी.जी. पारिख यांनी येथे पत्रकार परिषदेत दिली. यावेळी येथील रायगड जिल्हा सहकारी पथसंस्थांचा महासंघ कार्यालयात झालेल्या या पत्रकार परिषदेस सेंटरचे सहसचिव मधू मोहिते, उषाबेन शहा, अनिल हेब्बर, गुड्डी शा.ल. तसेच जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा श्रद्धा ठाकूर, तालुका अध्यक्ष योगेश मगर हेही उपस्थित होते.

**कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ**
(म्हाडाचा प्रादेशिक घटक)
म्हाडा MHADA

**ई-निविदा सूचना** ई-निविदा सूचना क्र. KB/EE-III/02 of 2021-22

मुख्य अभियंता-२/ प्रा.म्हाडा यांचे वतीने कार्यकारी अभियंता-३/ कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडाचा प्रादेशिक घटक), कक्ष क्र. ३१२, दुसरा माळा, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१ (दुरध्वनी क्र. ०२२ ६६४० ५२४९) निविदेतील अटी व शर्ती व post qualification निकषानुसार संभाव्य पात्र कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता, शासन आदेश क्र. बैठक-२०२१/प्र.क्र.१२८/गृनिभू दिनांक २३.१२.२०२१ मध्ये नमूद Prefab steel structure with precast sandwitch panel wall design या आधुनिक तंत्रज्ञान पद्धतीच्या व IIT, मुंबई कडून मंजूर घरकुलासाठी **'सी'** नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

**कामाचे नावः मौजे-तळीये, ता. महाड, जि. रायगड, स.क्र. १०६ (पै.), १०७ (पै.), ११९(पै.), १२०(पै.), १२१(पै.) येथे बाधित कुटुंबांचे पुनर्वसन करण्यासाठी, "सी" टर्न की पद्धतीने अंदाजित २६३ Prefab स्वतंत्र घरकुलांचे बांधकाम, सर्वेक्षण, सॉईल इनव्हेस्टिगेशन, प्लॅनिंग, डिझाइनिंग, ले-आऊट डीमार्केशन, कंस्ट्रक्शन व आवश्यक सर्व मंजुरी व कम्पलिशन इ.**

| अंदाजित निविदा रक्कम (रु. लाखात) | इसारा रक्कम (रु. लाखात) | सुरक्षा अनामत रक्कम (रु. लाखात) | कामाचा कालावधी (महिने) |
|---|---|---|---|
| ३७४७.११ लाख | १८.७३५ लाख | ३७.४७ लाख (५०% सुरुवातीला व ५०% देयकामधून) | ९ महिने (मानसुनसह) |

| | |
|---|---|
| **निविदा कागदपत्रे विक्री** | दि. ०३/०२/२०२२ वेळ दु. २:०० वा. पासून ते दि. १७/०२/२०२२ वेळ स. ११:३० वा. पर्यंत |
| **निविदा स्विकृती** | दि. ०३/०२/२०२२ वेळ दु. २:०० वा. पासून ते दि. १७/०२/२०२२ वेळ स. ०२:०० वा. पर्यंत |
| **तांत्रिक बोली उघडणे** | दि. २१/०२/२०२२ वेळ दु. २.०० वा. |

१. संपूर्ण निविदा पद्धती ही ऑनलाईन स्वरूपाची (ई-निविदा) दोन लिफाफा पद्धत राहील. त्याबाबतच्या सर्व सुचना, अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in व म्हाडाच्या https://mhada.gov.in या संकेतस्थळांवर प्रसिद्ध केल्या जातील. तसेच निविदा विषयीची कागदपत्रे महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून अपलोड करू शकता येतील. निविदाकारांनी डिजीटल सिग्नेचर असलेले ऑनलाईन निविदा ह्या ऑनलाईन अपलोड करावे.
२. कोणतेही कारण न देता निविदा स्विकारण्याचा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता-३ कोंकण मंडळ / म्हाडा यांचेकडे राहील. सशर्त निविदा विचारात घेण्यात येणार नाही व त्या थेट रद्द करण्यात येईल.
३. निविदा डाऊनलोड करणे व ऑनलाईन सादर करणेबाबत काही शंका असल्यास मदतीसाठी क्रमांकः १८००-३०७-०२२३२, E-mail: eproc.support@mahatenders.gov.in. वर संपर्क साधावा.

सही/-
कार्यकारी अभियंता-३
कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई

CPRO/A/56

म्हाडा – देशातील अग्रगण्य गृहनिर्माण संस्था

## पान १ वरुन

### अपेक्षाभंग...

तोंडाला पानं पुसण्याचं काम केंद्र सरकारने केल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत. मात्र, अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी इतर काही नव्या संकल्पनांचा वापर अर्थसंकल्पीय भाषणात केला आहे. यामध्ये गती-शक्ती सारख्या उपक्रमांसोबतच डिजिटल युनिव्हर्सिटी चा देखील उल्लेख त्यांनी केला. सध्या करोनामुळे ऑनलाईन पद्धतीने शिक्षण व्यवस्थेचा डोलारा तोलून धरला असताना आता डिजिटल युनिव्हर्सिटीची नवी संकल्पना देशात अंमलात आणण्याची घोषणा केंद्र सरकारने केली आहे.

**शेअर बाजारात उसळी**

शेअर बाजाराकडून या अर्थसंकल्पाचे स्वागत होताना दिसत आहे. शेअर बाजारात उत्साहाचे वातावरण दिसून येत असून, सेन्सेक्समध्ये ९०० अंकांची उसळी पाहायला मिळाली आहे. सध्या सेन्सेक्स ९१४ अंकांच्या उसळीसह ५९ हजार अंकांच्या जवळपास आहे. तर निफ्टीने देखील २०० अंकांपेक्षा जास्त वाढ नोंदवली आहे.बजेटमधील घोषणांवर गुंतवणूकदार मोठ्या प्रमाणावर खरेदी करत आहेत. सुरुवातीच्या व्यवहारात सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही निर्देशांक मजबूत झाले आहेत. अर्थसंकल्पाच्या घोषणेदरम्यान सन फार्मा, इंडसइंड बँक, टाटा स्टील, आयसीआयसीआय बँक आणि अल्ट्राटेक सिमेंटमध्ये चांगला खरेदीचा कल दिसून आला. दूरसंचार क्षेत्रासाठी अर्थसंकल्पात घोषणा झाल्यानंतर आयडियाच्या शेअरमध्ये लक्षणीय वाढ झाली. कंपनीच्या शेअरमध्ये ४ टक्क्यांपेक्षा जास्त वाढ नोंदवली गेली आहे. तर, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात दूरसंचार क्षेत्रासाठी वेगळी घोषणा केल्यानंतर, या क्षेत्रातील कंपन्यांच्या शेअर्समध्ये ५ टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याचे दिसून आले.

**१,२०८ लाख मेट्रिक टन धान्याची खरेदी**

येत्या आर्थिक वर्षाच्या खरीप हंगामात १६३ लाख शेतकऱ्यांकडून १,२०८ लाख मेट्रिक टन गहू आणि धानाची (भात) खरेदी होईल असा अंदाज आहे. यामुळे किमान आधारभूत किमतीचे सुमारे २.३७ लाख कोटी रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येतील, शेत जमिनीच्या सिंचनासाठी अर्थमंत्र्यांनी ४४,६०५ कोटी रुपयांच्या केन-बेतवा लिंक योजनेला मंजुरी दिली. येत्या आर्थिक वर्षात तेलबियांच्या उत्पादनवाढीवर भर दिला जाणार आहे. त्याचबरोबर अर्थमंत्र्यांनी सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देण्याची बाब अर्थसंकल्पात नमूद केली आहे. त्यांनी महत्वाची म्हणजे कृषी क्षेत्रात ड्रोनच्या वापरासाठी मंजुरी दिली आहे.

**क्रीडा क्षेत्रासाठी ३०० कोटी**

क्रीडा विभागासाठी बजेटमध्ये ३०० कोटी रुपयांपर्यंत निधी वाढविण्यात आला आहे. २०२१-२०२२ या वर्षासाठी क्रीडा अर्थसंकल्प २७५७.०२ कोटी रुपये होता, परंतु २०२२-२३ मध्ये क्रीडा अर्थसंकल्प ३०६२.६० कोटी रुपये झाला आहे. आशियाई क्रीडा आणि राष्ट्रकूल स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर सरकारने क्रीडा अर्थसंकल्पात निधीची वाढ केली आहे. यावेळी अर्थसंकल्पात राष्ट्रीय युवा सशक्तीकरण कार्यक्रमासाठी निधीची वाढ करण्यात आली आहे. मागील वर्षी १०८ कोटी रुपये खर्च करण्यात आले होते, तर यावेळी १३८ कोटी रुपये देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे खेलो इंडिया कार्यक्रमाचे बजेटही वाढवण्यात आले आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत श्री.शिवराम लक्ष्मण पालकर रा.केवाळे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : हरिग्राम, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत**

| भूमापन क्र. / उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ७७/२ अ | ०-५२-०० पो.ख. ०-०४-०० | १२.७ |

तरी वरील मिळकतीचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क–हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील आणि वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०१/०२/२०२२

सही/–
वि.द.बापट वकील
१४, हेंन्द्रे बिल्डींग, बंदर रोड,
पनवेल ४१०२०६

**जाहिरात**
**संस्थेचे उपहारगृह चालविण्याकरीता दरपत्रके मागविणेबाबत**

शासकीय तंत्र निकेतन पेण, या शैक्षणिक संस्थेचे उपहारगृह मासिक भाडे तत्वावर कंत्राटी पध्दतीने चालविण्यासाठी शासनमान्य नोंदणीकृत महिला बचत गट/महिला गृहउद्योग/महिला मंडळ/उपहारगृहधारक व इतर सहकारी तत्वावर चालणाऱ्या संस्था यांचेकडून सीलबंद लखोट्यातून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. विहित नमुन्यातील अर्जाची किंमत रु. ५००/- आहे. अर्ज दि. ०२-०२-२०२२ पासून ते दि. ११-०२-२०२२ पर्यंत संस्थेच्या कार्यालयातील ११.०० ते ४.०० या वेळेत (सुट्टीचा दिवस वगळून) उपलब्ध राहतील. पूर्ण भरलेले अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दि. ११-०२-२०२२ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत राहील.

सही/-
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, पेण

**कृषीवलच्या वाचकांना आवाहन**

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.






संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**



कै. श्री. विलास हरी तेंडुलकर, स्मरणार्थ, अलिबाग



कै. राधाबाई गोविंद पाटील, स्मरणार्थ अलिबाग

सौ. शकुंतला खुशाल गडा, वाढदिवसानिमित्त, विद्यानगर, अलिबाग



मोक्षिल मिहिर शाह, वाढदिवसानिमित्त, मंगल ग्रेन स्टोअर्स, बाजार पेठ अलिबाग

# बजेट : थोडी खूशी, थोडा गम...




। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

*कोरोनाचे ओसरत आलेले संकट आणि पाच राज्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुका या पार्श्वभूमीवर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्प सादर केला खरा, पण त्यात सर्वच घटकांना अपेक्षित न्याय देण्यात त्या अपयशी ठरल्या. त्यांच्या बजेटचे वर्णन कही खूशी, कही गम असेच करावे लागेल. ८० लाख घरे बांधण्यापासून ते लघु उद्योगाला २ लाख कोटी रुपये देण्यापर्यंतच्या २५ मोठ्या घोषणा केल्या आहेत. तसेच आरबीआय डिजीटल करन्सी लाँच करणार असल्याची घोषणाही सीतारमण यांनी केली आहे. चौथ्यांदा अर्थसंकल्प मांडणाऱ्या अर्थमंत्र्यांनी देशाचा आर्थिक विकास दर हा ९.२ टक्के राहणार असल्याचे सांगून देशवासियांना मोठा दिलासा दिला आहे. तसेच विकास हाच बजेटचा केंद्रबिंदू असून महिला, तरुण आणि शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.*





## मेक इन इंडिया अंतर्गत ६० लाख नोकऱ्या

येत्या आर्थिक वर्षात मेक इन इंडिया अंतर्गत ६० लाख नोकऱ्या येणार असल्याचे बजेटमध्ये सांगण्यात आले आहे. रोजगाराच्या संधी वाढवण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम नव्याने सुरू केले जाणार आहे. राष्ट्रीय कौशल्य पात्रता कार्यक्रम उद्योगांच्या गरजेनुसार तयार केला जाणार आहे. तसेच आवश्यकतेनुसार राज्य चालवल्या जाणाऱ्या औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांनाही अपग्रेड केले जाणार असल्याची माहिती अर्थसंकल्पादरम्यान देण्यात आली. शहरांमध्ये रोजगाराच्या संधी वाढविण्याचे काम केले जाणार आहे. पाच सर्वोच्च शैक्षणिक संस्थांना सेंटर ऑफ एक्सलन्सचा दर्जा दिला जाणार असून त्यांना २५ हजार कोटींचा विशेष निधी दिला जाणार आहे. एआयसीटीईतर्फे या संस्थांसाठी प्राध्यापक आणि प्रशिक्षण कार्यक्रमांवर देखरेख ठेवली जाणार आहे. यासोबतच दोन लाख अंगणवाड्या अत्याधुनिक करण्यात येणार आहेत. येत्या पाच वर्षांत ३० लाख अतिरिक्त रोजगार निर्माण करणार आहेत.

## भारत जारी करणार ‘डिजीटल करन्सी’

केंद्र सरकारने अर्थसंकल्पामध्ये डिजीटल करन्सीसंदर्भात मोठी घोषणा केली आहे. यंदाच्या आर्थिक वर्षापासून केंद्रीय बँकेच्या माध्यमातून भारत स्वत:ची डिजीटल करन्सी जारी करणार आहे. यासंदर्भातील घोषणा अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्येच ही करन्सी जारी केली जाणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्प सादर करताना डिजीटल रुपीची घोषणा केली. हे चलन रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या माध्यमातून जारी केले जाणार आहे. डिजीटल रुपी हे आभासी चलन ब्लॉकचेन आणि इतर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आरबीआयकडून २०२२-२३ दरम्यान जारी केले जाणार आहे. यामुळे अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे.



## वर्षभरात २५ हजार किमीचे राष्ट्रीय महामार्ग



देशात तब्बल २५ हजार किलोमीटरचे राष्ट्रीय महामार्ग उभे करण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी अर्थमंत्र्यांनी पंतप्रधान गतीशक्ती योजनेची घोषणा केली आहे. या अंतर्गत देशातील राष्ट्रीय महामार्गांचे जाळे २५ हजार किलोमीटरने वाढवण्याची घोषणा करण्यात आली आहे. पुढील वर्षभरात अर्थात २०२२-२३ साठी हे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. दरम्यान, देशातील डोंगराळ भागात रस्त्यांचे जाळे विस्तारण्यासाठी निर्मला सीतारमण यांनी पर्वतमाला या योजनेची घोषणा केली आहे. याअंतर्गत दुर्गम आणि डोंगराळ भागामध्ये रस्ते बांधण्याचे उपक्रम हाती घेतले जाणार आहेत. हे उपक्रम पीपीपी अर्थात खासगी आणि सार्वजनिक भागीदारीच्या तत्वावर राबवले जाणार आहेत.

## किसान ड्रोन्सचा वापर

यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये कृषी क्षेत्रामध्ये तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात वापरले जाणार असल्याची घोषणा केली. किसान ड्रोन्सचा वापर आता शेतीमध्ये केला जाणार असल्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्प सादर करताना केली. हे कृषी ड्रोन्स पिकांची पाहणी करणे, जमिनीच्या नोंदी ठेवणे तसेच किटकनाशकांच्या फवारणीसाठी वापरले जाणारे आहेत. कृषी आणि पिक उत्पादनासाठी तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करण्यात येणार आहे. गंगा नदीच्या किनाऱ्यांवर शेतीला विशेष प्राधान्य देण्यासाठी योजना आखण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांची पिके, खरबी आणि रब्बी पिकांसाठी देण्यात येणाऱ्या मदतीमधून एक कोटी शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.



## विद्यार्थ्यांचे ऑनलाइन शिक्षण होणार सोपे




कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शिक्षण ऑनलाइन झाले आहे. मात्र या शिक्षणात विद्यार्थ्यांना अनेक अडथळे येत आहेत. इंटरनेट, रेंज, स्मार्ट फोन्स नाहीत, अशा अनेक समस्यांमुळे बरेचसे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहिले आहेत. या विद्यार्थ्यांसाठी केंद्र सरकारने आपल्या अर्थसंकल्पामध्ये विशेष तरतूद केली आहे. केंद्र सरकारच्या पंतप्रधान ई-विद्या योजनेअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या एक क्लास, एक टीव्ही चॅनेल या मोहिमेचा विस्तार आता करण्यात आला आहे. पूर्वी या मोहिमेअंतर्गत पहिली ते बारावी इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी एक असे १२ टीव्ही चॅनेल्स सुरू करण्यात आले होते. मात्र आता त्यांची संख्या १०० पर्यंत वाढवण्यात आली आहे. यामुळे प्रत्येक राज्याला आपल्या प्रादेशिक भाषांमध्ये शैक्षणिक कार्यक्रमांची निर्मिती करता येऊ शकेल. ज्याचा जास्तीत जास्त प्रमाणात विद्यार्थी लाभ घेऊ शकतील.



## ‘नारी शक्तीला पाठबळ’ तीन नव्या योजना सुरु करणार

महिला सक्षमीकरणासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सांगितले. महिला सबलीकरणासाठी बजेटमध्ये तीन महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत. महिला आणि बाल कल्याण मंत्रालयाच्या मिशन शक्ती, मिशन वात्सल्य आणि सक्षम अंगणवाडी आणि पोषण २.० सारख्या योजनांना व्यापक रुप देणार. तसेच देशातील २ लाख अंगणवाड्यांना सक्षम अंगणवाडीच्या रुपात अपग्रेड केल्या जाणार आहेत. महिला आणि बालकांच्या सर्वांगीण विकासाकरिता तीन योजना सुरु करण्यात आल्या आहेत. बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी अंगणवाड्यांमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. त्यासाठी अंगणवाड्यांचा दर्जा सुधारला जाईल. महिला आणि बालकांच्या एकात्मिक विकासासाठी तीन योजना सुरू करण्यात आल्या आहेत. बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी दोन लाख अंगणवाड्या आणखी उत्तम केल्या जाणार आहेत. तसेच मानसिक आरोग्य समुपदेशनासाठी राष्ट्रीय टेलि मानसिक आरोग्य कार्यक्रम सुरू केला जाणार आहे. नॅशनल डिजिटल हेल्थ इकोसिस्टमसाठी खुले व्यासपीठ सुरू केले जाईल. याद्वारे डिजिटल रजिस्ट्री, युनिक हेल्थ आयडेंटिटी आणि आरोग्य सुविधा मिळविण्यासाठी युनिव्हर्सल ॲक्सेस दिला जाईल. इमर्जन्सी क्रेडिट लाइन गॅरंटी स्कीम मार्च २०२३ पर्यंत वाढवली जाईल. हमी कवच ५०,००० कोटी रुपयांवरून एकूण ५ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढविला जाईल. या माध्यमातून हेल्थ प्रोव्हायडर्ससाठी डिजिटल रजिस्ट्रीज, युनिक हेल्थ आयडेंटिटी आणि आरोग्य सेवा मिळवण्यासाठी युनिव्हर्सल ॲक्सेस मिळवता येईल.



## सर्वसामान्यांसाठी उभारणार ८० लाख घरे

केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये अर्थमंत्र्यांनी पीएम आवास योजनेअंतर्गत ८० लाख घरे बांधण्याचे लक्ष ठेवले आहे. या योजनेसाठी ४८ हजार कोटींचा निधी देण्यात आला आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे ही ८० लाख घरे देशातील विविध राज्यांमध्ये शहरी आणि ग्रामीण भागात बांधली जाणार आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांसाठी याचा फायदा होईल. देशातील सर्व लोकांना घरे देण्याच्या उद्देशाने प्रधानमंत्री आवास योजना ६६९ जिल्ह्यांमध्ये सुरू आहे. या योजनेअंतर्गत सरकार बेघर लोकांना घर देते. या योजनेच्या लाभार्थ्यांना अनुदानही दिले जाते. पात्र शहरी गरीबांना घर खरेदी आणि बांधण्यासाठी गृहकर्जावर क्रेडिट लिंक्ड सबसिडी मिळते. जर एखाद्या व्यक्तीने नुकतेच घर किंवा फ्लॅट घेतला असेल तर त्यालाही या योजनेचा लाभ मिळू शकतो. तुमच्या घरावर घेतलेल्या कर्जासाठी लागणाऱ्या व्याजावर सरकारकडून मिळणाऱ्या सबसिडीचा तुम्ही लाभ घेऊ शकता. यामुळे तुमच्या घराची किंमत कमी होईल, जे फायद्याचे आहे. २०१५ मध्येच, पीएम आवास योजना ग्रामीण अंतर्गत अर्ज करण्यासाठी मोबाईल ॲप तयार करण्यात आलं आहे. ते गुगल प्ले स्टोअरवरून डाऊनलोड करता येतं. डाऊनलोड केल्यानंतर तुम्हाला मोबाईल नंबरच्या मदतीने लॉगिन आयडी तयार करावा लागेल. यानंतर या ॲपद्वारे तुमच्या मोबाइल नंबरवर वन टाईम पासवर्ड पाठवला जाईल. लॉगिन केल्यानंतर आवश्यक माहिती भरावी लागेल.




## सुपरफास्ट इंटरनेट सुविधा

गेल्या अनेक महिन्यांपासून भारतात ५-जी नेटवर्क उपलब्ध होणार असल्याची चर्चा सुरू आहे. आता अखेर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी ५-जी बाबत घोषणा केली आहे. यावर्षी स्पेक्ट्रमचा लिलाव केला जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे. देशातील ५-जी सेवा ही खासगी दूरसंचार कंपन्यांच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली जाणार आहे. यासोबतच ग्रामीण भागात डिजिटल स्वरुपाचा विस्तार करण्यासाठी तब्बल ७५ डिजिटल बँकिंग युनिट्स देशभरातल्या ७५ जिल्ह्यांमध्ये उभारले जाणार असल्याचे अर्थमंत्र्यांनी यावेळी जाहीर केले. यासोबतच नॅशनल डिजिटल हेल्थ इकोसिस्टीम उभारण्याची देखील घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये आरोग्यविषयक सेवा पुरवणाऱ्यांची डिजिटल नोंदणी केली जाईल.



“ जे स्वदेशीचा नारा देत आहेत तेच आता विदेशी वस्तू स्वस्त करीत असल्याचे अर्थसंकल्पातून दिसून आल्याने केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा पूर्णपणे फसवा आहे. विदेशी वस्तू स्वस्त करुन मोदी सरकार एकप्रकारे स्वदेशी व्यावसायिकांपुढे स्पर्धा निर्माण करीत आहे. त्यातून रोजगार कसा निर्माण होणार? याशिवाय सरकारने ६० लाख नवीन नोकऱ्या देण्याची घोषणा केली आहे. पण त्या कशाप्रकारे उपलब्ध केल्य जाणार हे स्पष्ट केलेले नाही, त्याचबरोबर शिक्षण क्षेत्रासाठी ऑनलाईन पद्धतीने आणि विविध शैक्षणिक चॅनेल्स उपलब्ध केल्या जाणार आहे. पण त्या उपलब्ध करताना ग्रामीण भागात तशा पायाभूत सुविधा आहेत का याचा विचारही करण्यात आलेला नाही. आजही ग्रामीण भागात विजेची कमतरता आहे. अनेक शाळांमध्ये टीव्ही उपलब्ध नाहीत. विद्यार्थ्यांकडे टॅबही नाहीत, अशा स्थितीत सादर झालेले हे बजेट पूर्णपणे फसवे असून, यामुळे बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढेल हे नक्की.

– चित्रलेखा पाटील,
शेकाप महिला आघाडी प्रमुख



“ अर्थसंकल्पामध्ये ज्या घोषणा केल्या आहेत त्या सामान्य माणसांच्या हिताचे नाहीत. इन्फ्रास्ट्रक्चरच्या दृष्टीने लोकांना सोयीचे होणार आहे. यामध्ये रस्ते चांगले होतील, घरे स्वस्त होतील. इन्कम टॅक्स स्लॅबवर करदात्यांना कोणतीही सवलत मिळालेली नाही. इन्कम टॅक्स रिटर्न स्लॅब तसाच ठेवला आहे. यामध्ये कोणतीही थेट सवलत देण्यात आलेली नाही.

– भारत अमृतलाल तन्ना,
इन्शुरन्स ॲड स्ट्रॅटीजिक फायनाशियल कन्सल्टंट



“ कोव्हिडोत्तर काळात देशातील शिक्षण व्यवस्था पुन्हा रूळावर आणणे हे देशापुढील फार मोठे आव्हान आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील विद्यार्थीही गेली दोन वर्षे औपचारिक शिक्षणापासून दूर राहिले आहेत. केंद्रीय अर्थसंकल्पात घोषणा करण्यात आलेले विविध भारतीय भाषांतून शिक्षण देणारे डिजिटल विद्यापीठ, उच्च दर्जाच्या इ-कन्टेन्टची निर्मिती, इयत्ता पहिली ते बारावीसाठी सुमारे २०० टी.व्ही. चॅनेल्सची निर्मिती, प्रादेशिक भाषांतून पूरक शिक्षणाची सुविधा इ. गोष्टी देशातील शिक्षणाची विस्कटलेली घडी पुन्हा बसविण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरतील असा आशावाद बाळगायला हरकत नाही.

– प्रा.जयेश म्हात्रे,
मराठी विभाग-जे.एस.एम. महाविद्यालय, अलिबाग-रायगड



“ अर्थसंकल्प परिणामकारक होता. देशांतर्गत उत्पादन कंपन्यांच्या संबंधात कर धोरणाची घोषणा हे आत्मनिर्भर भारत मिशनच्या दिशेने एक पाऊल आहे. तसेच, आरबीआयद्वारे डिजिटल चलन सुरू केल्याने देशातील बँकिंग प्रणालीवर मोठा परिणाम होईल. यामुळे क्रयशक्तीचे संचालन अत्याधिकपणे नियंत्रणात आणता येईल.

– प्रज्ञा हरिश्चंद्र शिरधनकर,
चार्टर्ड अकाऊटंट, अलिबाग.




“ कोव्हिड पँडेमिकमध्ये निर्माण झालेली परिस्थिती व त्यायोगे वाढत असलेल्या मानसिक समस्यांचा सामना करण्यासाठी बजेटमधे नॅशनल टेलिमेंटल हेल्थ सर्व्हिसेस सुरू करण्याची घोषणा केली आहे. यामध्ये देशभरात २३ टेलिमेंटल हेल्थ सेंटर्सचे जाळे उभारण्यात येईल. बंगळूरू येथील निमहॅन्स इन्स्टिट्यूट हे त्याचे नोडल सेंटर असेल व आयआयटी बंगळूर त्याला तांत्रिक सहकार्य पुरवण्याची जबाबदारी पार पाडेल. मानसिक आरोग्याचा केंद्रीय अर्थसंकल्पात विचार होणे स्वागतार्ह आहे, मात्र एकूण सार्वजनिक आरोग्यव्यवस्था, त्यामधील मनुष्यबळविकास व आरोग्य व्यवस्थेतील रोजगारनिर्मिती आदींवरील एकूण आर्थिक तरतूदींचे जीडिपीच्या तुलनेतील प्रमाण तोळामासाचे असण्याची परंपरा कायम आहे.

– डॉ. सचिन जायभाये,
फिजिशियन,
मुक्ता क्लिनिक, अलिबाग



“ या अर्थसंकल्पात सर्व देशातील सर्व घटकांचा विचार करून अर्थसंकल्प सादर व्हायला पाहिजे होता पण तसे न होता या ठिकाणी भांडवलदारी सरकारने वंचित शोषित वर्गावर अन्याय केला आहे. त्यात शेतकरी कामगार मजूर याचा कुठल्याच प्रकारचा विचार करण्यात आला नाही आणि शेतकरी व कामगार गोरगरीब जनतेच्या तोंडाला पाने पुसली आहेत. हा अर्थसंकल्प भांडवलदारी लोकांच्या हिताचा तयार करण्यात आलेला आहे. या देशाचा पालनहार शेतकरी दाता याच्यावर कोरोनाचे संकट कोसळले, गारपीट अवकाळी पाऊस अस्मानी संकट कोसळले याचा विचार करणे गरजेचे होता पण याचा विचार न करता या सरकारने सुद्धा एका प्रकारचा बदला घेतल्या सारखेच कार्य केलेले आहे. तरी आमचा शेतकरी कामगार पक्षातर्फे या अर्थसंकल्पावर बहिष्कार आहे.

– रामेश्वर वायाळ,
शेकाप कार्यकर्ता, बुलढाणा



“ ऑनलाईन शिक्षण ही खरतर श्रीमंत शाळांची मक्तेदारी होती. हळूहळू ग्रामीण भागातील शाळा यात रूळायला लागल्या आहेत. २०२२-२३ च्या बजेटमध्ये घोषणा केलेले ई विद्या योजनेमध्ये एक चॅनल एक क्लास याचा फायदा निश्चितच ग्रामीण भागातील मुलांना होईल. त्यातच डिजीटल विश्व विद्यालयाची घोषणा केलेली आहे. प्रत्येक घरात शिक्षण १२वी पर्यंत स्थानिक भाषा अनिवार्य या सगळ्या घोषणा निश्चितच चांगल्या आहेत.

– वंदना आंब्रे,
प्राध्यापिका, जा.र.कन्या शाळा



“ शेतकरी, कामगारवर्ग यांच्यासाठी काहीही न देणारा महत्वाचे संरक्षण खाते व एलआयसी खाजगीकरणाकडे नेणारा केंद्रात सहकार मंत्रालय निर्माण केले आहे याची जाणिव करणारा तोचतोचपणा असणारा निराशाजनक अर्थसंकल्प.

– योगेश मगर,
अध्यक्ष, सहयोग पतसंस्था अलिबाग



“ २०२२ चे बजेट हे सध्याच्या परिस्थितीला धरून भाकीत केलेले आहे ते आता च्या पिढीला समोर ठेवून बनविल्यासारखे वाटते. खासगी गुंतवणूक वाढण्यासाठी बरीच पावले उचलेलि दिसत आहे. इन्कम टॅक्स जसे थे ठेवले आहे. कोरोनाच्या त्रासातून बाहेर पडण्यासाठी थोडी सूट अपेक्षित होती पण तिथे निराशा झाली. क्रिप्टो करन्सीवर टॅक्स लावला आहे पण त्याबद्दल खूप बारीक असे नियोजन करण्याची गरज आहे. इज ऑफ दुइंग बिझनेस बदल बोलले जात आहे पण त्याने जे व्यवसाय करताना लागणाऱ्या परवानग्या या लवकर मिळाल्यास त्याने नवीन प्रोजेक्ट सुरू करायला चालना मिळू शकते. थोडक्यात हे बजेट हे न्यूट्रल ठेवले आहे ना खूप काही फायदे आहेत ना कुठे तोटा दिसत आहे.

– अभिजित सुरेश पाटील
पितृछाया बिल्डर्स डायरेक्टर, आदर्श पतसंस्था अलिबाग

## संपादकीय

# सर्वसामान्यांची निराशा

सध्या स्वातंत्र्याची पंचाहत्तरी साजऱ्या करणाऱ्या भारताला येत्या पंचवीस वर्षांत विविध आघाड्यांवर पुढे नेण्यासाठीचा उद्दात्त हेतू जाहीर करून केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थमंत्री म्हणून आपला सलग चौथा अर्थसंकल्प मंगळवारी सादर केला. येत्या पंचवीस वर्षांचा काळ 'अमृतकाल' असे संबोधत त्यांनी स्वातंत्र्याचा शतकोत्सवाच्या दिशेने जाताना चार मुख्य ध्येयांची घोषणा केली. कमकुवत वर्गासाठी प्रोत्साहन, गुंतवणुकीसाठी वित्तपुरवठा, प्रधानमंत्री गतीशक्ती ज्यात रस्ते, रेल्वे आदी पायाभूत तसेच माहिती तंत्रज्ञानाचा समावेश असेल. तसेच डिजिटल क्षेत्राला अर्थात तरुण वर्गाला प्रोत्साहन अशा अभ्यासपूर्ण मांडणीतून त्यांनी अर्थसंकल्प मांडला. गहू आणि तांदळाची खरेदी, त्याद्वारे शेतकऱ्यांना २.३ लाख कोटी थेट खात्यात, ऑरगॅनिक फार्मिंगला प्रोत्साहन, नाचणीला प्राधान्य, तेलबियाणांना उत्तेजन, डिजिटल आणि उच्च तंत्रज्ञान कृषी क्षेत्रासाठी उपलब्ध करण्याचा उद्देश त्यांनी यातून सांगितला. पीएम गतीशक्तीच्या माध्यमातून स्वच्छ उर्जा, २५ हजार किमी रस्त्यांचा विस्तार, फाय जी, सोलर पॅनल उत्पादन प्रोत्साहन आदींचा समावेश आहे. कमकुवत गटांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने दोन लाख कोटी रुपये सुक्ष्म आणि छोट्या उद्योगासाठी उपलब्ध करून दिले जातील. डिजिटल क्षेत्रात अपेक्षेनुसार देशाची डिजिटल करन्सी जारी करण्याची घोषणा त्यांनी केली. ड्रोन शक्ती तंत्रज्ञान विकासाला प्राधान्य, इ-पासपोर्ट, खाजगी आणि सरकारी सहकार्याने खास करून तरुणांसाठी नोकऱ्या आणि संधी अशा घोषणा त्यांनी केल्या. शिवाय पीएम इविद्या अंतर्गत दोनशे टीव्ही चॅनलद्वारे शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रादेशिक भाषांतून शिक्षणाची सुविधा, तसेच महिलांसाठी घोषणा त्यांनी केल्या. मुळात ही सुविधा घेण्यासाठी टीव्ही आणि ते चालवण्यासाठी लागणारी वीज ही स्थिती अद्याप आव्हानात्मक परिस्थितीत आहेत याची त्यांना कल्पना असायला हवी. आपण आयटी तंत्रज्ञान जगाला देत असताना आपल्या देशासाठी पुरेशी सुविधा देऊ शकलो नाही ही खरेच लज्जास्पद गोष्ट आहे. यासाठी केवळ ड्रोन नव्हे तर व्यापक धोरण करायला हवे. हे सरकार वापरत असलेली शीर्षके प्रभावी असतात, यात शंका नाही. प्रश्न असतो तो आशयाबाबत. चांगले पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन करणे आणि प्रत्यक्ष कृती यातील फरक आतापर्यंत जनतेला कळून चुकला आहे. शंभर स्मार्ट सिटींची घोषणा पाच वर्षांपूर्वी झाली, त्यापैकी एकाचेही नाव कोणी आता घेत नाही. तसेच, गंगा स्वच्छ करण्याचा सात वर्षांपूर्वी सुरु केलेला २० हजार कोटींचा प्रकल्प आता काय स्थितीत आहे, याचीही कोणाला खबर नाही. गंगा साफ झाली नाही हे माहिती आहे, मात्र त्यासाठीचा निधी कुठे गेला ते मात्र कोणालाही माहिती नाही. तरी आता या ताज्या अर्थसंकल्पात शहरांना पुनरुज्जीत करण्याची घोषणा केली गेली आहे. राज्यांना एक लाख कोटींहून अधिक मोफत कर्ज, गहू, तांदळासाठी प्रोत्साहन हे विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आहे हे लक्षात येते. आपण नोकऱ्या देऊ शकत नाही हे कबुल करण्याऐवजी जे आधीपासूनच काम करुन रोजगार निर्माण करीत आहेत त्या एनिमेशन आणि गेमिंग उद्योगाला आपल्या कवेत घेण्यासाठी डिजिटल धोरणात सवलतींसाठी त्याचा समावेश केला आहे. महाभारतातील कल्याणकारी राज्याचा संदर्भ देत कररचनेची घोषणा त्यांनी केली खरी मात्र प्रत्यक्षात यात सर्वसामान्यांच्या जगण्याचा किती विचार केला या प्रश्नाचे उत्तर काही अर्थसंकल्पात मिळत नाही. सुधारित रिटर्न दोन वर्षांपर्यंत भरता येणे, सोसायटीवरील सरचार्ज कमी करणे हे स्वागतार्ह असले तरी डिजिटल व्यवहारांवर तीस टक्के कर आकारणी हे डिजिटल धोरणासाठी प्रोत्साहक नाही. एकीकडे क्रिप्टो करन्सीवर बंदी घालायची आणि दुसरीकडे केवळ कर लावून फक्त कमाई करायची, असे हे दुटप्पी धोरण आहे. सर्वाधिक जीएसटी जमा झाल्याची घोषणा करायची आणि राज्यांना त्यांचा करहिस्सा न देता त्यांची आर्थिक नाकेबंदी करायची, यातून जनतेचे भले कसे होईल? फारसे बदल नसलेला, सर्वसामान्यांसाठी कररचनेत कोणताही बदल न केलेला हा अर्थसंकल्प आहे. शेतकरी, कामगार, नोकरदार या वर्गाला कोणत्याही प्रकारचा दिलासा यात नाही. शिवाय, गुंतवणुकीच्या नावाखाली मोठ्या रकमांची तरतूद केली हे खरे आहे, मात्र त्यातून निर्माण होणाऱ्या तसेच सध्याही असलेले महागाई वाढण्याचे आव्हान सरकार कसे पेलणार हे स्पष्ट नाही. म्हणजे त्यांनी त्याचा कोणताही विचार अर्थसंकल्पात केलेला नाही. त्यामुळे बहुसंख्य सर्वसामान्य जनतेला सध्याच्या होरपळून टाकणाऱ्या महागाईपासून दिलासा नाही तो नाहीच.

---

प्रा. नंदकुमार गोरे

# मध्यमवर्गाच्या पदरी उपेक्षाच



मध्यमवर्गाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा असतो तो प्राप्तिकराचा दर. महागाई वाढत असताना आणि गुंतवणुकीवरील व्याजदर कमी होत असताना किमान यावर्षी तरी प्राप्तिकरात सवलत मिळावी, अशी मध्यमवर्गाची अपेक्षा होती. पाच राज्यांच्या निवडणुका डोळ्यासमोर असताना अन्य घटकांना काही ना काही देणाऱ्या अर्थमंत्र्यांनी मध्यमवर्गाच्या तोंडाला मात्र पानं पुसली. भाजपचा पाठिराखा असलेल्या नोकरदार वर्गाला सरकारने जणू गृहीत धरलं. निवडणुका होत असलेल्या पाच राज्यांमध्ये मध्यम वर्गाचं प्रमाण अत्यल्प असल्याने त्यांचा फटका बसणार नाही, हे गृहीत धरून अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी अर्थसंकल्पात मध्यमवर्गाच्या पदरात काहीही टाकलेलं नाही.

सरकारने यावेळीही प्राप्तिकरात सर्वसामान्यांना कोणताही दिलासा दिला नाही. म्हणजेच सध्याच्या प्राप्तिकर प्रणालीनुसार भविष्यातही कर भरावा लागेल. मात्र, कर व्यवहार प्रणालीत सुधारणा करण्यात आली आहे. या अंतर्गत आता दोन वर्ष जुने प्राप्तिकर कर परतावा अपडेट करण्याची सुविधा मिळेल. या वेळी कर रचनेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. केवळ २.५ लाख रुपयांपर्यंतचं वार्षिक उत्पन्न करमुक्त असेल. उत्पन्न २.५ ते ५ लाख दरम्यान असेल तर पाच लाखांवर पाच टक्के कर भरावा लागेल. तथापि, प्राप्तिकर कायद्याच्या कलम ८७ चा फायदा घेऊन अजूनही पाच लाख रुपयांपर्यंतच्या वार्षिक उत्पन्नावर कर वाचवता येईल. याचा अर्थ असा, की एखाद्याचं वार्षिक करपात्र उत्पन्न पाच लाख रुपयांपर्यंत असेल, तर त्याला कोणताही प्राप्तिकर भरावा लागत नाही; परंतु उत्पन्न पाच लाख दहा हजार रुपये असेल, तर दहा हजार रुपयांवर कर भरण्याऐवजी, पाच लाख दहा हजार रुपयांवर कर भरावा लागेल. पाच लाख दहा हजारातून अडीच लाख वजा केले तर दोन लाख ६० हजार रुपयांवर प्राप्तिकर भरावा लागेल.

प्राप्तिकर परतावा भरण्यासाठी सध्या दोन पर्याय आहेत. नवीन पर्याय १ एप्रिल २०२० रोजी देण्यात आला. नवीन कर स्लॅबमध्ये, पाच लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्नावरील कर दर कमी ठेवण्यात आला होता, परंतु वजावट काढून घेण्यात आली. दुसरीकडे, जुना टॅक्स स्लॅब निवडल्यास विविध कर कपातींचा लाभ घेता येईल. गेल्या दहा वर्षांमध्ये कर स्लॅबमध्ये अनेकवेळा बदल करण्यात आले आहेत. ३१ मार्च २०१० पूर्वी केवळ १.६० लाख रुपयांपर्यंतचं वार्षिक उत्पन्न करमुक्त होतं, जे २०११ मध्ये सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात १.८० लाख रुपये करण्यात आलं होतं. त्यानंतर वेळोवेळी बदल करण्यात आले. पीएफमध्ये २.५ लाख रुपये किंवा त्याहून अधिक योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांना कर भरावा लागेल. त्यांना मिळणारं व्याज करपात्र उत्पन्नात समाविष्ट केलं जाईल. ही मर्यादा १ एप्रिल २०२१ रोजी किंवा त्यानंतर केलेल्या योगदानांवर लागू आहे. अर्थात गुंतवणूकदाराचं वय ७५ वर्षांपेक्षा जास्त असल्यास परतावा आवश्यक नाही

७५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्यांना टॅक्स रिटर्न भरण्यापासून सूट देण्यात आली होती. केवळ पेन्शन किंवा बँकेच्या व्याज उत्पन्नावर अवलंबून असलेल्या ७५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांना आयटीआर दाखल करण्याची गरज नाही. ते इतर स्त्रोतांकडूनही उत्पन्न मिळवत असतील, मग ते भाडं असो किंवा इतर काही, त्यांना नेहमीप्रमाणे आयटीआर भरणं आवश्यक असेल. युनिट-लिंक्ड इन्शुरन्स प्लॅन्स (यूलिप्स) च्या प्रीमियम्सवर कलम १० (१० व) अंतर्गत उपलब्ध कर सूट मर्यादित करण्यात आली आहे.

---

कैलास ठोळे

# भांडवली गुंतवणुकीवर भर



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी अर्थसंकल्पात काही महत्त्वाच्या घोषणा केल्या. त्यात भारतीय रिझर्व्ह बँकेच्या डिजिटल चलनाचा समावेश आहे. अर्थात या घोषणेत नावीन्य नाही. त्याचं कारण सहा महिन्यांपूर्वीच रिझर्व्ह बँकेने तसं स्पष्ट केलं होतं. क्रिप्टो करन्सीबाबत नियमावली करण्याची शक्यता व्यक्त होत होती; परंतु तसा कायदा करण्याबाबत वक्तव्य नसलं तरी सीतारमण यांनी क्रिप्टो करन्सीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर तीस टक्के कर लागू केला आहे. सरकारच्या उत्पन्नात भर पडणार असली तरी क्रिप्टो करन्सीत गुंतवणूक करणाऱ्यांची फसवणूक झाल्यास कुणाकडे दाद मागायची, याचं उत्तर अर्थमंत्र्यांनी दिलेलं नाही. रिझर्व्ह बँक यावर्षी ब्लॉकचेन आणि इतर तंत्रज्ञानाचा वापर करून डिजिटल चलन जारी करणार आहे. यामुळे अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे. आभासी डिजिटल मालमत्तांच्या कर आकारणीत बदल करण्यात आले आहेत. अशा कोणत्याही मालमत्तेच्या हस्तांतरणावर ३० टक्के कर लागेल. त्यावर कोणतीही सवलत दिली जाणार नाही. कॉर्पोरेट कर १८ टक्क्यांवरून १५ टक्के करणं हे ही एक महत्त्वाचं पाऊल आहे.

गेल्या आठवड्यातच जाहीर झालेल्या अहवालात देशातल्या बेरोजगारांमध्ये तीन कोटींची भर पडल्याचा उल्लेख आहे. बेरोजगारी हे देशापुढील सर्वात मोठं आव्हान आहे. सीतारमण यांनी देशात साठ लाख लोकांना रोजगार मिळणार असल्याचं स्वप्न दाखवलं आहे; परंतु ते कसं पूर्ण होणार हे सांगितलेलं नाही. पूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दरवर्षी एक कोटी युवकांना रोजगार मिळेल, असं जाहीर केलं होतं; परंतु प्रत्यक्षात गेल्या ४५ वर्षांमध्ये आज सर्वाधिक बेरोजगारी अनुभवायला मिळत आहे. पायाभूत क्षेत्रात केलेल्या कामांना अर्थमंत्र्यांनी गती देण्याचं ठरवलं आहे. भांडवली गुंतवणूक मोठ्या उद्योगांना आणि एमएसएमईंना रोजगार वाढवण्यास मदत करते. महामारीच्या प्रभावातून बाहेर पडण्यासाठी हे आवश्यक आहे. त्यामुळे खासगी गुंतवणूकदारांची क्षमता वाढवली जाईल. यासाठी केंद्रीय अर्थसंकल्पात भांडवली गुंतवणूक पाच लाख ५४ हजार कोटींवरून सात लाख ५५ हजार कोटी रुपयांपर्यंत नेण्याची तरतूद करण्यात आली आहे. याचा अर्थ तरतूद दोन लाख एक हजार कोटी रुपयांनी वाढवण्यात आली आहे.

अर्थमंत्र्यांच्या तरतुदींनुसार हवामानबदलाला सामोरं जाण्यासाठी सार्वभौम हरित रोखे जारी केले जातील. यातून मिळणारं उत्पन्न कार्बन उत्सर्जन कमी करणाऱ्या प्रकल्पात वापरलं जाईल. गेल्या सहा महिन्यांपासून सेमीकंडक्टरच्या पुरवठा साखळीतल्या विस्कळीतपणाचा वाहन, इलेक्ट्रॉनिक्स, मोबाईलसह अन्य उद्योगांना किती फटका बसला, हे जगाने अनुभवलं आहे. यासंदर्भातलं तैवान, चीन आणि दक्षिण कोरियावरचं अवलंबित्व कमी करण्यासाठी आता सरकारने पावलं उचलण्याचं ठरवलेलं दिसतं. सेमीकंडक्टरच्या उत्पादनासाठी उद्योग विकसित केले जातील. त्यामुळे निर्यातीलाही चालना मिळेल. ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स म्हणजेच व्हीजीसी क्षेत्रात रोजगाराच्या मोठ्या संधी आहेत. अशा परिस्थितीत, व्हीजीसी प्रमोशन टास्क फोर्स संबंधित सर्व भागधारकांशी संवाद साधून मार्ग शोधेल. त्यातून देशांतर्गत क्षमतेद्वारे देशांतर्गत बाजारपेठेच्या आणि जागतिक बाजारपेठेच्या गरजा पूर्ण करण्यावर भर असेल.

मोदी सरकारच्या काळात पायाभूत सुविधांवर भर दिला जात आहे. रेल्वे, रस्ते, उड्डाणपूल, विमानतळ आदींना गती दिली जात आहे. आताच्या अर्थसंकल्पातही त्याचा उल्लेख आहे. पंतप्रधान गती शक्ती मास्टर प्लॅन अंतर्गत एक्सप्रेस वे बांधले जातील. राष्ट्रीय महामार्गाचं जाळं २५ हजार किलोमीटरपर्यंत वाढवण्यात येणार आहे. या अभियानासाठी २० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. गरिबांसाठी ८० लाख घरं बांधली जातील.

त्यासाठी अर्थसंकल्पात ४८ हजार कोटी रुपयांची तरतूद आहे. २०२२-२३ मध्ये ई-पासपोर्ट जारी केले जातील; ज्यात चिप असेल. पोस्ट ऑफिसमध्येही आता एटीएम उपलब्ध होणार आहेत. शिवाय पोस्ट खात्यात कोअर बँकिंग सुविधा देण्यात येणार आहे. लघु, सूक्ष्म व मध्यम उद्योगांना बळकटी देण्यासाठी नव्या योजना सुरू केल्या जातील.

या क्षेत्राला पाच वर्षांसाठी सहा हजार कोटी तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद अत्यल्प आहे. वर्षासाठी बाराशे कोटी रुपयेच मिळणार आहेत. उदयम, ई-श्रम, एनसीएस आणि असीम पोर्टल एकमेकांशी जोडली जातील. महामारीच्या काळात शाळा बंद झाल्यामुळे ग्रामीण भागातली मुलं दोन वर्षांपासून शिक्षणापासून वंचित होती. त्यांच्यासाठी पीएम ई-विद्या अंतर्गत एक क्लास-वन टीव्ही चॅनेल सुरू करण्यात येणार आहेत.

---

# ऑनलाईन परिक्षांसाठी गदारोळ

दहावी आणि बारावी विद्यार्थी परीक्षा ऑनलाईन घ्यावे या मागणीसाठी मुंबईत विद्यार्थी मोठ्या प्रमाणात आक्रमक झाले. केवळ मुंबईच नाही तर नागपूर, औरंगाबाद आणि उस्मानाबाद येथे विद्यार्थी याच मागणीसाठी रस्त्यावर उतरले. यासह धारावीमध्ये शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांच्या घरासमोर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी घेराव घातला. विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षेला विरोध दर्शवत गदारोळ केला. यावेळी आक्रमक झालेल्या विद्यार्थ्यांना पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला, याकारणाने परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. गेल्या काही दिवसांपूर्वी परीक्षा ऑफलाईनच होणार आहे, असे शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी सांगितल्यानंतर सोमवारी विद्यार्थी त्याविरोधात आक्रमक झाले. शाळा ऑनलाईन असताना परीक्षा ऑफलाईन का? असा आक्रमक सवाल आंदोलक विद्यार्थ्यांनी केला. धारावी परिसरात मोठ्या संख्येने विद्यार्थी सकाळपासूनच जमले. यंदा परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घ्यावी, अशी त्यांची मागणी असून कालच शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी परीक्षा ऑफलाईन आणि वेळापत्रकानुसार होणार असल्याचे सांगितले होते. परंतु हा निर्णय विद्यार्थ्यांना मान्य नाही. परंतु ग्रामीण भागात तांत्रिक सुविधांचा अभाव आहे. येथे शिक्षण विभागाला ऑनलाइन क्लासेस घेणेही योग्य प्रकारे शक्य झाले नाही. असे असताना ऑनलाइन परीक्षांचा आग्रह धरणे चुकीचे असल्याचे आहे. तसेच तांत्रिक सुविधा नसलेल्या ग्रामीण भागात जुलैपासूनच ऑफलाइन वर्ग सुरू झाले असल्यामुळे तसेच तांत्रिक सुविधा असलेल्या शहरी भागात आधी ऑनलाईन आणि नंतर ऑक्टोबरमध्ये ऑफलाईन वर्ग सुरू करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यास पुरेसा झाला आहे. तसंच प्रात्यक्षिकंही पुरेशा प्रमाणात झालेली आहेत. विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रमही कमी करण्यात आलेला असून परीक्षेची पूर्ण तयारी झालेली आहे. तरीही विद्यार्थ्यांना रस्त्यावर उतरुन आंदोलन का करावेसे वाटले हे न उलगडणारे कोडेच वाटत आहे आणि तसेही हा प्रश्न चर्चेतूनही सुटण्यासारखा होता मग त्यासाठी आंदोजन करण्याची गरज का भासावी हा प्रश्न पडतोच.

वारा-वारा
नेहा कवळे

# विश्वविक्रमी नदाल

राफेल नदाल हा स्पेनचा एक टेनिसपटू आहे. सध्या नदाल एटीपी क्रमवारीमध्ये पाचव्या क्रमांकावर आहे. अनेक टेनिस तज्ज्ञांच्या मते नदाल आजतागायत झालेल्या सर्वोत्तम टेनिस खेळाडूंपैकी एक आहे. आजच्या घडीला जगातील सर्वात यशस्वी पुरुष टेनिसपटू असलेल्या राफेल नडालने आजपर्यंत २१ ग्रँड स्लॅम जिंकलेले आहेत. ११ ऑक्टोबर २०२० ला रोनाल्ड गॅरोस (फ्रेंच ओपन) मध्ये सर्बियाच्या नोवाक जोकोविचला हरवून त्याने सर्वात जास्त २० ग्रँड स्लॅम सिंगल्स टाईटल्स जिंकण्याच्या रॉजर फेडररच्या विक्रमाची बरोबरी केली. तर २०२२ ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेमध्ये त्याने दानिल मेदवेदेव्हला पराभूत करून २१ वे ग्रँड स्लॅम विजेतेपद मिळवले. तो सर्वात जास्त वेळा फ्रेंच ओपन जिंकणारा टेनिसपटू ठरला आहे. २४ मास्टर्स टेनिस स्पर्धा जिंकल्या आहेत. २००८ साली झालेल्या बीजिंग ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये त्याने स्पेनसाठी सुवर्णपदक पटकावले. २०१० सालची यू.एस. ओपन स्पर्धा जिंकून नदालने चारही ग्रँड स्लॅम स्पर्धा जिंकण्याचा विक्रम पूर्ण केला. हा पराक्रम साधणारा खुल्या टेनिस काळामधील नदाल हा वयाने सर्वात लहान टेनिसपटू आहे. राफेल नदालला तांबड्या मातीवरील सर्वोत्कृष्ट टेनिसपटू मानले जाते. त्याने आजवर आजवर विक्रमी नऊ वेळा फ्रेंच ओपनमध्ये तर विक्रमी आठ वेळा मोंटेकार्लो मास्टर्समध्ये अजिंक्यपद पटकावले आहे. नदालने रविवारी मेलबर्नमध्ये विक्रमी २१ वे ग्रँड स्लॅम अजिंक्यपद पटकावले, २० अजिंक्यपदांपर्यंत फेडरर प्रथम पोहोचला. मग जोकोव्हिच आणि नदाल यांच्यात स्पर्धा होती. नदाल २० अजिंक्यपदांपर्यंत पोहोचलेला दुसरा टेनिसपटू, तर जोकोव्हिच तिसरा. फेडररची कारकीर्द जवळपास संपुष्टात आली आहे. जोकोव्हिच अजूनही तरुण आहे. पण या दोघांना मागे टाकून अनपेक्षितरीत्या नदाल पुढे गेला आहे. फ्रेंच स्पर्धेत जोकोव्हिच खेळण्याची शक्यता कमी, तर त्या कोर्टवर नदालचे साम्राज्य. त्यामुळे तेथे २२ व्या ग्रँड स्लॅम अजिंक्यपदासाठी नदाल प्रयत्न करणार हे नक्की.

---




गुरुनहत्वा हि महानुभावान् ।
श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके ।
हत्वार्थकामांस्तु गुरुनिहैव
भुञ्जीय भोगान्रुधिरप्रदिग्धान् ।।५।।

गुरुन्- ज्येष्ठ व्यक्ती किंवा गुरुजन; अहत्वा- हत्या न करता; हि- निश्‍चितच; महा-अनुभावान्- महात्म्यांना; श्रेयः- श्रेयस्कर; भोक्तुम्- जीवनाचा उपभोग घेणे; भैक्ष्यम्- भिक्षा मागून; अपि- जरी; इह- या जीवनामध्ये; लोके- या जगात; हत्वा- हत्या करुन; अर्थ- प्राप्ती; कामान्- इच्छेने; तू- पण; गुरुन्- ज्येष्ठ व्यक्तींना; इह- या जगतात; एव- निश्चितपणे; भुञ्जीय- भोगावेच लागेल; भोगान्- भोग्य वस्तू; रुधिर- रक्ताने; प्रदिग्धान्- माखलेले, रंजित.

महात्मासम असणाऱ्या माझ्या गुरुजनांना मारुन जगण्यापेक्षा भिक्षा मागून जगणे अधिक श्रेयस्कर आहे. जरी त्यांना भौतिक लाभाची इच्छा असली तरी ते ज्येष्ठ आहेत. जर त्यांची हत्या केली तर आपले सर्व भोग रक्तरंजित होतील.

तात्पर्य : धर्मग्रंथातील नियमांनुसार जो गुरु निंद्यकर्म करण्यात गुंतला आहे व जो विवेकशून्य झाला आहे त्याचा त्याग करण्यास काहीच हरकत नाही. दुर्योधनाच्या आर्थिक पाठिंब्यामुळे भीष्म आणि द्रोण यांना दुर्योधनाची बाजू घेणे भागच होते. वास्तविकपणे, केवळ आर्थिक सहाय्यतेच्या आधारावर त्यांनी दुर्योधनाची बाजू घेणे योग्य नव्हते. या परिस्थितीमुळे त्यांनी गुरु म्हणून आपली आदरणीयता गमावली होती; पण असे असले तरी अर्जुनाला वाटते की, ते सर्वजण त्याच्यापेक्षा ज्येष्ठ आहेत आणि म्हणून त्यांची हत्या करुन भौतिक लाभाचा उपभोग घेणे म्हणजे रक्ताने माखलेल्या लुटीचा भोग घेण्यासारखेच आहे.

**न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो**
**यद्वा जयेम यदि वा नो जयेयुः ।**
**यानेव हत्वा न जिजीविषाम**
**स्तेऽवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः ।।६।।**

न- नाही; च-सुद्धा; विद्मः- आम्हाला माहीत आहे; कतरत्- कोणते; नः- आमच्यासाठी; गरीयः- श्रेयस्कर किंवा उत्तम; यत्-वा- अथवा; जयेम- आम्ही जिंकू; यदि- जरी; वा-किंवा; नः- आम्ही; जयेयुः- ते जिंकतील; यान्- ज्यांना; एव-खचितच; हत्वा- हत्या करुन; न- कधीच नाही; जिजीविषामः- आम्ही जगू इच्छितो; ते- ते सर्वजण; अवस्थिताः- उभे आहेत; प्रमुखे- सामोरे; धृर्तराष्टाः- धृतराष्ट्राचे पुत्रक्ष.

**त्यांच्यावर विजय प्राप्त करणे की त्यांच्याकडून पराजित होणे या दोहोंपैकी कोणती गोष्ट अधिक चांगली आहे हे आम्हाला कळत नाही. जर आम्ही धृतराष्ट्रपुत्रांची हत्या केली तर आम्हाला जगण्याची आवश्यकता नाही. तरीदेखील युद्धभूमीमध्ये ते आमच्यासमोरच उभे आहेत.**

**तात्पर्यः-** जरी युद्ध करणे हे क्षत्रियांचे कर्तव्य असले तरी युद्ध करुन अनावश्यक हिंसा करण्याचा धोका पत्करावा, की युद्धापेक्षा भिक्षा मागून जीवन कंठावे हे अर्जुनाला कळत नव्हते. युद्धामध्ये जर त्याने शत्रूवर विजय प्राप्त केला नाही तर भिक्षा मागणे हेच केवळ त्याच्या उदरनिर्वाहाचे साधन होते आणि विजयाचीही शाश्वती नव्हती, कारण दोन्हींपैकी कोणताही पक्ष विजयी होऊ शकतो. जरी विजयश्री हातात माळ घेऊन वाट पाहात असली आणि (आणि त्यांची बाजू समर्थनीयच होती) तरी जर धृतराष्ट्रपुत्रांचा युद्धात मृत्यू झाला, तर त्यांच्या अनुपस्थितीत जीवन कंठणे अत्यंत कठीण होते. अशा प्राप्त परिस्थितीत तो त्यांचा दुसऱ्या प्रकारचा पराभवच होता. अर्जुनाने विचारात घेतलेल्या या सर्व गोष्टी निश्चितपणे सिद्ध करतात की, तो भगवंतांचा केवळ महान भक्तच नव्हता तर तो अत्यंत ज्ञानी होता आणि त्याचा आपल्या मनावर व इंद्रियावर पूर्ण संयम होता. राजघराण्यात जन्मला असूनही त्याची भिक्षा मागून कंठण्याची इच्छा म्हणजे अनासक्तीचे आणखी एक लक्षण होय.

(क्रमशः)

(भगवद्गीता स्पर्धा माहिती पान क्रमांक ८ वर)

---

## लोकसंसद

### बघ्यांची बेताल दुनिया

नाशिक शहरातील जय भवानी रोड परिसरात धुमाकूळ घालणाऱ्या बिबट्याला सात तासांच्या अथक प्रयत्नानंतर वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना शेवटी जेरबंद करण्यात यश आले असले तरी बचावकार्याच्या वेळी उसळलेल्या बघ्यांच्या गर्दीमुळे वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना, पोलिसांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागला. वर्षभरापूर्वी पुण्यातील कोथरुड भागात बघ्यांच्या गर्दीमुळे एक रानगवा प्राणास मुकला. बघ्यांच्या गर्दीमुळे गवा बिथरला आणि सैरावरा पळू लागला, जखमी झाला. त्याला पकडल्यानंतर त्याच्यावर उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. तीन वर्षांपूर्वी मुंबईतील डोंगरी येथे इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर बघ्यांची एकच गर्दी उसळली. शासकीय यंत्रणांकडून बचावकार्य आणि मदतकार्य चालू असताना बघ्यांमधील काही अतिउत्साही महाभाग मोबाइलवर छायाचित्रण करण्यात गुंतले होते. खरं तर ही बघ्यांच्या गर्दीची काही उदाहरणे आहेत. कारण कोणतीही दुर्घटना, अपघात किंवा वन्यजीव नागरी वस्तीत येण्याच्या घटना असोत, काहीही झाले की क्षणार्धात त्या ठिकाणी बघ्यांची गर्दी उसळते आणि बचावकार्य, मदतकार्य बाजूला पडून गर्दीला आवरायचे वेगळेच काम सुरू होते. दुर्घटनास्थळी आपण केलेल्या गर्दीमुळे मदतकार्यात अडथळा निर्माण होतो याचेही साधे भान गर्दी करणाऱ्या लोकांना राहत नाही. खरंच समाजाची सद्सद्विवेकबुद्धी आणि संवेदनशीलता इतकी कमी झाली आहे का? असा प्रश्न पडतो.

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

### किमान बेस्ट अर्थसंकल्प तरी विलीन करा

केंद्रीय अर्थसंकल्पापाठोपाठ मुंबई मनपा आपला अर्थसंकल्प ३ फेब्रुवारीला सादर करणार आहे. आगामी निवडणुकांवर डोळा ठेवून मुंबईकरांच्या हिताचाच व कोणतीही करवाढ नसलेला अर्थसंकल्प असेल यात शंका नाही. बेस्ट उपक्रमाचे मुंबई मनपात विलीनीकरण करण्याचे पक्षप्रमुख श्री उद्धव ठाकरे यांनी २०१७ मनपा वचननाम्यात आश्वासन दिले होते तर बेस्टचा अर्थसंकल्प मुंबई मनपात विलीन करण्याचे आदेश दिले होते. १४ ऑगस्ट २०१७ ला बेस्ट समितीत तर २७ ऑक्टोबरला महापालिकेत विलीनीकरणाचा ठराव एकमताने मंजूर झाला आहे परंतू गेली पाच वर्षे तो मुख्यालयात धूळ खात पडला आहे. गेल्या पाच-सहा वर्षापासून बेस्ट उपक्रम तोट्यात असून मुंबई मनपाच्या अर्थसहाय्यावर बेस्टचा डोलारा उभा आहे. एअर इंडिया एसटी प्रमाणे बेस्टची सुद्धा तशी अवस्था होऊ शकते. मुंबई मनपाच्या स्वस्त व सुरक्षित प्रवासामुळे परिवहन विभाग तर विद्युत विधेयकामुळे विद्युत विभाग तोट्यात जात आहेत हा तोटा का होतो याचा लोकप्रतिनिधींनी विचार करावयास हवा. पण दुर्दैवाने तसे घडत नाही. कोणे एके काळी देश-विदेशात नावलौकिक मिळवलेला बेस्ट उपक्रम आर्थिक गर्तेत सापडणे हे करदात्यांच्या पैशांची उधळपट्टी ठरेल.सेवानिवृत्त कर्मचारी आपल्या हक्कांची देणी तर विद्यमान कर्मचारी विविध भत्यांपासून वंचित आहेत. केंद्र सरकारने रेल्वेचा अर्थसंकल्प मुख्य अर्थसंकल्पात विलीन केला आहे. मुंबई मनपाच्या आरोग्य शिक्षण अग्निशमन इत्यादी अर्थसंकल्प अ श्रेणीत तर फक्त बेस्टचा क श्रेणीत असल्यामुळे अनुदानाऐवजी कर्ज घेण्याची वेळ येते तर संचित तोटा वाढत जात आहे. म्हणून बेस्ट उपक्रमाचे मुंबई मनपात तात्काळ विलीनीकरण करणे किंवा बेस्टचा अर्थसंकल्प पालिकेच्या अ अर्थसंकल्पात विलीन करून मुंबईकरांचे व कामगारांचे हित जोपासावे अशीच सविनय प्रार्थना आहे.

**- सुभाष अभंग,** ठाणे

### पर्यटनस्थळे पुन्हा गजबजणार!

कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा प्रभाव कमी झाल्याने राज्य सरकारने निर्बंध आणखी शिथिल केले आहेत. ज्या जिल्ह्यांमध्ये ९० टक्के लोकांना कोरोना प्रतिबंधक लसीचा पहिला डोस आणि ७० टक्के नागरिकांचे दोन्ही डोस पूर्ण झाले आहेत, तेथील पर्यटन स्थळे आणि राष्ट्रीय उद्याने खुली करण्याचा निर्णय राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने नुकताच जाहीर केला आहे. या निर्णयाचा लाभ कोल्हापूरसह राज्यातील मुंबई, पुणे, सातारा, सांगली, सिंधुदुर्ग, भंडारा, रायगड, रत्नागिरी, गोंदिया, चंद्रपूर या जिल्ह्यांना निर्बंध शिथिलतेचा लाभ मिळणार आहे. सर्व पर्यटन स्थळांवर ऑनलाईन तिकिट उपलब्ध असेल आणि ती त्यांच्या नियमित वेळांमध्ये सुरू राहतील, असे या आदेशामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. पर्यटनस्थळे खुली करण्यात येत असली, तरी तेथे मास्क, सोशल डिस्टन्सिंग व इतर नियमांचे पालन करणे बंधनकारक असणार आहे राज्य सरकारने घेतलेला निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहे कारण पर्यटन स्थळे खुली केल्यामुळे अनेक छोट्या-मोठ्या उद्योगांना उभारी मिळणार आहे अनेकांना रोजगार उपलब्ध होणार आहे पर्यटन स्थळामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होवून अनेक उद्योगांना चालना मिळते पर्यटन करणाऱ्यांनी कोरोनाचे सर्व नियम पाळूनच सफर करणे गरजेचे आहे तरच पर्यटनाचा आनंद द्विगुणित होईल !!

**- राजू जाधव,** मांगूर

## म ह त्वा चे

### तरुणाचा अपघाती मृत्यू

। चिपळूण । वृत्तसंस्था ।
गुहागर तालुक्यातील आबलोली ते मार्गताम्हाणे जाणाऱ्या मढाळ बोऱ्या फाटा येथे दुचाकीस्वाराचा वाहनावरील ताबा सुटल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला आहे. अमोल धोंडू आग्रे (वय. २९) असे मृत दुचाकीस्वाराचे नाव आहे. अमोल हा आपल्या ताब्यातील दुचाकीने कारुळ ते कौंढरताम्हाणे घरी जात होता. यावेळी मढाळ गावच्या सीमेजवळ आला असता भरधाव वेगाने दुचाकी चालविल्याने दुचाकीवरील ताबा सुटल्याने ती गाडी गटारात पडली. यामध्ये अमोल गंभीर जखमी झाला आणि अमोलचा मृत्यू झाला. याची नोंद चिपळूण पोलीस स्थानकात करण्यात आली असून अधिक तपास चिपळूण पोलीस करीत आहेत.

### काशिनाथ फकीरप्पा कालवश

। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।
राजापुरातील नवजीवन हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्रकुमार व्हनमाने यांचे वडील काशिनाथ फकीरप्पा व्हनमाने (८५) अल्पशा आजाराने चपळगाव अक्कलकोट येथे निधन झाले. गेले काही दिवस त्यांची प्रकृती बरी नव्हती, त्यांच्यावर उपचारही सुरु होते, मात्र सोमवारी सायंकाळी त्यांना अस्वस्थ वाटू लागले व त्यातच त्यांची प्राणज्योत मालावली. त्यांच्या पश्चात पत्नी, राजेंद्रकुमार व अजित हे दोन मुलगे, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### प्रकाश वळंजू यांना पितृशोक

। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।
राजापूर तालुक्यातील वाटूळ गावचे रहिवाशी, राजापूर तालुका बौद्धजन संघाने तालुक्यात प्रथमच चालू केलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहाचे पहिले सुप्रिटेंड भिकाजी बाबू वळंजू यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. पत्रकार प्रकाश वळंजू यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# संकटांच्या श्रृंखलेला अंत कधी

**✻ सिंधुदुर्ग जिल्ह्यातील काजू बागायतदारांची चिंता** **✻ काजू पिकामागील शुक्लकाष्ठ संपता संपेना**

। वैभववाडी । वृत्तसंस्था ।
सिंधुदुर्ग जिल्ह्यात काजू पिकामागील शुक्लकाष्ठ संपता संपत नसल्याचे चित्र आहे. सातत्याने बदलणाऱ्या ऋतुमानामुळे लांबणारा पाऊस, अवकाळीच्या धारा आणि ढगाळ वातावरण अशा संकटचक्रात सापडलेला जिल्ह्यातील काजू बागायतदार, या संकटांच्या श्रृंखलेला अंत कधी? असा आर्त प्रश्न निर्माण करत आपली चिंता व्यक्त करताना दिसत आहे.

कारण नुकताच झालेल्या जोरदार वाऱ्याचा काजू बागांना तडाखा बसला असून, मोठे नुकसान झाले आहे.

जिल्ह्याच्या अर्थकारणात महत्त्वाचे मानलेले काजू पिक तीन - चार वर्षांत संकटचक्रात अडकले असून, काजू बागायतदार त्यात होरपळले जात आहेत. यावर्षी ऑक्टोबरमध्येच अनेक ठिकाणी काजूला चांगला मोहोर आला. परंतु, मान्सून लांबल्यामुळे हा मोहोर वाया गेला. त्यानंतर सतत ढगाळ वातावरण आणि अवकाळी पावसाने थैमान घातले.

संपूर्ण नोव्हेंबर महिना आणि डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पाऊस झाला. त्याचा परिणाम काजू पिकावर झाला. त्यानंतर थंडी पडली. बागायतदारांनी विविध फवारण्या घेतल्या. त्यामुळे काजू बागांना पुन्हा पालवी आणि मोहोर आला. त्यातच पुन्हा जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात पुन्हा अवकाळी पाऊस झाला. दोन-तीन दिवस ढगाळ वातावरण राहिले. त्याचा फटकादेखील काजू बागांना बसला.

संकटचक्राची ही मालिका सुरू असतानाच जानेवारी महिन्याच्या अंती जिल्ह्यात जोरदार वारे वाहू लागले. सह्याद्री पट्ट्यात या वाऱ्याचा वेग प्रचंड होता. झाडे अक्षरक्षः पिळवटून टाकली जात होती. वाऱ्याचा हा तडाखा काजू पिकाला सहन झाला नाही. या वाऱ्यात काजूच्या झाडांना आलेला मोहोर, फळे आणि पानेदेखील वाऱ्यामुळे गळून पडली आहेत. काही ठिकाणी कच्चा काजू मोठ्या प्रमाणात गळून पडल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.



**नुकसानप्रवण क्षेत्र**
करूळ, कुंभवडे, नावळे, शिराळे, सडुरे, खांबाळे, आर्चिणे, सांगुळवाडी, कुर्ली (ता. वैभववाडी) घोणसरी, फोंडा, हरकुळ, नरडवे, नाटळ, भिरवंडे (ता. कणकवली) या भागातील अनेक बागांचे मोठे नुकसान झाले आहे.

**संकटामागुनी संकट**
२०१९ मध्ये कोरोनामुळे काजूचे दर गडगडले. ६० ते ७० रुपयांवर आले. त्यानंतर २०२० मध्येदेखील कोरोनाचा फटका बसला. एकीकडे नैसर्गिक आपत्ती आणि दुसरीकडे कृत्रिम संकटे यामध्ये शेतकरी कोलमडून गेला आहे.

> बदलत्या वातावरणाचा फटका गेल्या काही वर्षांपासून काजू पिकाला बसत आहे. त्यामुळे भविष्यात द्राक्ष, डाळिंब पिकाप्रमाणे काजू पिकाची काळजी घ्यावी लागणार आहे. याशिवाय काजू व्यवस्थापनावरील खर्च वाढत असल्यामुळे काजूला अधिक दर मिळण्यासाठी प्रयत्न व्हावेत.
> – प्रा. विवेक कदम, काजू अभ्यासक

# ‘डॉ. तानाजी चोरगे आधुनिक विश्वकर्मा’



। चिपळूण । प्रतिनिधी ।
‘कृषीभूषण’ साहित्यिक डॉ. तानाजीराव चोरगे हे बहुमुखी प्रतिभावंत आहेत. चोरगे यांनी ज्याला ज्याला स्पर्श केला त्याचं त्याचं सोनं झालेलं आहे. डॉ. चोरगे हे आधुनिक युगातील विश्वकर्मा असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी केले आहे.

लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिर आणि महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा चिपळूण आयोजित ‘कृषीभूषण’ साहित्यिक डॉ. तानाजीराव चोरगे सत्कार समारंभ सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर ‘कृषीभूषण’ डॉ. तानाजीराव चोरगे, सौ. अंजली तानाजीराव चोरगे, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे कार्यवाह प्रकाश पायगुडे, चिपळूण शाखेचे अध्यक्ष प्रा. संतोष गोनबरे, लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिराचे अध्यक्ष डॉ. यतीन जाधव होते. याप्रसंगी महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे चोरगे यांना स्मृतिचिन्ह, ग्रंथभेट आणि पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिराच्या कलादालनाला शशिकांत बाळासाहेब शेळके वाळवा यांचेकडून कुलदीप पोतदार यांच्या कुंचल्यातून साकारलेले ‘कृषीभूषण’ डॉ. तानाजीराव चोरगे सरांचे तैलचित्र यावेळी भेट देण्यात आले.

# रत्नागिरी विमानतळाची धावपट्टी सज्ज

**उदय सामंत यांची माहिती**

। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।
येथील विमानतळावरील २१०० मीटरची धावपट्टी विमान उतरण्यास सज्ज झाली असून चिपीप्रमाणे रत्नागिरीतही बहात्तर सीटर विमान उतरु शकेल. हे विमानतळ तटरक्षक दलाकडे असल्यामुळे सुरक्षेच्यादृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी अजून सव्वा वर्ष लागेल.

तोपर्यंत देशांतर्गत वाहतूकीसाठी विमानतळ वापरण्याच्या परवानगीसाठी केंद्राकडे पाठपुरावा केला जाईल, असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. रत्नागिरीतील विमानतळाच्या कामाची पाहणी केल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

यावेळी कमांडर निरज सिंग उपस्थित होते. मंत्री सामंत म्हणाले की, विमानतळाबाबत निर्माण होत असलेले गैरसमज आणि शंका दूर करण्यासाठी प्रत्यक्ष पाहणी करुन तटरक्षक दलाच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधला.

विमानपार्कींग व अन्य सुविधांसाठी साडेसतरा एकर जागेची आवश्यकता आहे. ती जागा घेण्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

# ‘अणसुरेची जैवविविधता’ आता एका क्लीकवर

। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।
निसर्गसंपदेची माहिती व्हावी या उद्देशाने तालुक्यातील अणसुरे ग्रामपंचायतीतर्फे अणसुरे जैवविविधता या नावाचे लोकजैवविविधता संकेतस्थळ विकसित केले आहे. गावच्या जैवविविधततेचे संकेतस्थळ विकसित करणारी अणसुरे ही जिल्ह्यातील पहिली ग्रामपंचायत ठरली आहे.




वाढत्या शहरीकरणासह विविध कारणांमुळे निसर्गसाखळीचा अविभाज्य घटक असलेली निसर्गसंपदा नष्ट होऊ लागली आहे. त्यातून, पर्यावरणाचा समतोल ढासळू लागला आहे. अशा स्थितीत पर्यावरणाचा समतोल पूर्वीप्रमाणे कायम राहण्यासाठी निसर्गसंपदेचे जतन व्हावे, त्यासाठी जनजागृती व्हावी आणि लोकांना माहिती मिळावी म्हणून ‘अणसुरे जैवविविधता’ हे संकेतस्थळ बनवण्यात आले. या संकेतस्थळाचा आ. राजन साळवी यांनी नुकताच आरंभ केला.

# विद्यार्थिनीने बनवले आत्महत्या रोखणारे उपकरण

**राज्यस्तरीय प्रदर्शनासाठी निवड**

। सिंधुदुर्ग । वृत्तसंस्था ।
देवरुख तालुक्यातील कोंड्ये येथील निर्मला भिडे जनता विद्यालय व इंद्रनील तावडे कनिष्ठ महाविद्यालय येथे नववीत शिकणाऱ्या रिया दीपक लाड या विद्यार्थिनीने तयार केलेल्या ‘एस.पी.हूक’ (सुसाईड प्रिव्हेंटींग हूक) या आत्महत्या रोखणाऱ्या उपकरणाची राज्यस्तरीय इन्स्पायर मानक ॲवॉर्ड प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

या प्रदर्शनासाठी जिल्ह्यातून ७५० नामांकने नोंदविण्यात आली.



त्यातून ७७ जणांची निवड झाली. त्यात दिव्याचा समावेश आहे. यासाठी तिला विज्ञान शिक्षक ज्ञानेश्वर शिंदे, मुख्याध्यापक अरुण कुराडे व सहकारी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. इमारतीचे बांधकाम करताना एखाद्या खोलीमध्ये पंखा अडकविण्यासाठी छताला सुरूवातीला हूक तयार करून ठेवला जातो.

# साहसी पर्यटकांना साद घालतोय कशेळीतील सुळक्या

। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।
कनकादित्य मंदिर आणि नयनरम्य किनाऱ्यावरुन सुर्यास्ताचे दर्शन घेण्यासाठी प्रसिद्ध असलेले कशेळीत साहसी पर्यटकांसाठीचे मुख्य ठिकाण बनणार आहे. येथील किनाऱ्यावर समुद्रामध्ये उभा असलेला साठ फुट उंच ‘सुळ्या’ हा उभाच्या उभा सुळका साहसी पर्यटकांना आव्हान देत आहे. हा अपरिचित ‘सुळ्या’ जिद्दी माउंटेनेरिंगच्या सदस्यांनी सर केला आहे.

सुर्यास्त दर्शनासाठी कशेळी ग्रामपंचायतीने किनाऱ्यावर विकसित केलेल्या पर्यटन किनाऱ्यापासून डोंगराच्या कडेने साधारण पाऊणतास चालत गेल्यावर समुद्राच्या पाण्यात वेढलेला ‘सुळया’ नावाचा ६० फुटाचा उंच सुळका आहे. याचा शोध स्थानिक ग्रामस्थ संदीप राडये यांनी घेतला होता. त्यांच्याकडून जिद्दी माउंटेनेरिंग संस्थेचे क्लायंबर अरविंद नवेले यांना माहिती मिळाली. अपरिचित असा हा सुळका सर करण्यासाठी जिद्दीच्या पथकाने रेकी केली.



रविवारी (ता. ३०) सकाळी जिद्दीचे पथक घटनास्थळी दाखल झाले. सुळक्यावर चार ते पाच ठिकाणी रोप लावण्यासाठी दगडात बोल्ट, हँगर ड्रिलिंग करुन लावण्यात आले. दगडाला ड्रिल होत नसल्यामुळे आयत्यावेळी मोहीम थांबेल की काय अशी स्थिती होती. इलेक्ट्रीक हॅमर ड्रिल मशिन उपलब्ध होते; परंतु ते विजेवर चालवले जाते. अडचणींवर मात करत १००० केव्हीचा एक जनरेटर सुळक्या जवळ नेण्यात आला. सकाळी ७ वाजता सुळक्यावरील चढाईसाठी पहिले पाऊल टाकले.

प्रसाद शिगवण, राकेश हर्डीकर, सतीश पटवर्धन, उमेश गोठीवरेकर, आकाश नाईक, वैभव कांबळे, आशिष शेवडे, ओंकार सागवेकर यांनी सुळक्यावर यशस्वी चाढाई केली. कोकणात पर्यटन वाढीसाठी मनापासून धडपडणारी जिद्दीच्या पथकात २१ ते ४० वयोगटातील तरुण आहेत. उमेश गोठीवरेकर हे एकावन्न वर्षीय एकमेव वरीष्ठ व्यक्ती आहेत. या मोहिमे दरम्यात स्थानिक हॉटेल व्यावसायिक संदीप राडये यांनी मदत केली.

> सुर्यास्त पॉईंटमुळे पर्यटनदृट्या कशेळीला महत्त्व प्राप्त झाले आहे. परजिल्ह्यातून येणारा पर्यटक मुक्कामी राहिल्यास रोजगार वाढेल. त्यासाठी सुळ्यासारखी नवनवीन ठिकाणे पर्यटकांपर्यंत पोचवण्यात येत आहेत.
> – संदीप राडये, ग्रामस्थ

## देश-विदेश

# केंद्राने शब्द पाळला नाही

**राकेश टिकैत यांचे प्रतिपादन**

**संतप्त आंदोलकांनी साजरा केला विश्वासघात दिन**

। लुधियाना । वृत्तसंस्था ।
केंद्राने आंदोलनप्रसंगी शेतकऱ्यांना दिलेला शब्द पाळला नसल्याचे प्रतिपादन भारतीय किसान युनियनचे राष्ट्रीय प्रवक्ते राकेश टिकैत यांनी केले आहे. भारतीय किसान युनियनतर्फे ठिकठिकाणी धरणे देऊन विश्वासघात दिवस साजरा केला. या पार्श्वभूमीवर प्रसारमाध्यमांसह संवाद साधताना त्यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे.



किमान आधारभूत किमतीवर समिती स्थापन करून शेतकऱ्यांवरील खटले मागे घेण्याचे आश्वासन केंद्राद्वारे देण्यात आले होते. मात्र त्यानंतर समितीही स्थापन केली नाही किंवा गुन्हेही मागे घेतलेले नाहीत, असा आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात आला आहे. कृषी कायद्याच्या मुद्द्यावरून आंदोलन करणाऱ्या हजारो शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

याशिवाय एमएसपीवर समिती स्थापन करण्याचे आश्वासन आणि चर्चा पूर्ण झालेली नाही. हे सर्व मुद्दे या निवडणुकीतून गायब झाले असं म्हणत शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे.

यासंदर्भात राकेश टिकैत यांनी मत व्यक्त करताना म्हटले की, जो येईल तो म्हणतो, वीजबिल माफ करू, पिकाला भाव देऊ. शेतकरी या आश्वासनांवर विश्वास ठेवून लगेच नेत्यांवर विश्वास ठेवतो, मात्र नंतर फसवणूक होते. सरकार ‘एमएसपी’ बद्दल बोलत नसेल तर आम्ही त्यावर उपचार शोधू, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

भाजपच्या सर्वच मंत्र्यांनी आगामी निवडणुकांच्या दृष्टीने पाच राज्यात जोरदार निवडणूक प्रचार सुरू केला असला तरी, त्यांच्या भाषणात जिना आणि मुघलांचाच अधिक उल्लेख होतो. शेतकऱ्यांच्या एमएसपीचा मुद्दा गायब आहे.

यूपी विधानसभा निवडणुकीतून शिक्षण, रोजगार, शेती हे मुद्दे गायब झाले आहेत. त्यामुळे आता पुन्हा एकदा भारतीय किसान युनियनचे नेते आक्रमक होण्याची शक्यता आहे.

> आगामी काळातील पाच राज्यांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या निवडणुकीच्या रणधुमाळी मुघल आणि जिना यांची चर्चा सुरु आहे, मात्र सातशे शेतकऱ्यांच्या मृत्यूची कुठेही चर्चा नाही.- राकेश टिकैत, राष्ट्रीय प्रवक्ते, भारतीय किसान युनियन.

# लढाऊ विमान रडारवरुन गायब

। टोकियो । वृत्तसंस्था ।
जपानच्या हवाई दलाचे लढाऊ विमान रडारवरून बेपत्ता झाले आहे. याबाबतची माहिती जपानने दिली आहे. एका लढाऊ विमानाने उड्डाण केल्यानंतर काही वेळातच हे विमान रडारवर दिसेनासे झाले. आता या विमानाचा शोध घेतला जात आहे.

जपानच्या एअर सेल्फ डिफेन्स फोर्सच्या प्रवक्त्याने दिलेल्या माहितीनुसार, टेक ऑफ केल्यानंतर कोमात्सु कंट्रोल टॉवरच्या डेटावर एक एफ १५ जेट दिसेनासे झाले. विमान मध्य इशिकावा क्षेत्रातील कोमात्सु एअरबेसपासून पाच किलोमीटर अंतरावर जपानच्या समुद्राजवळ बेपत्ता झालं.

# मुंबई महानगरपालिकेची नवी प्रभागरचना जाहीर

। मुंबई । वृत्तसंस्था ।
बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूका २०२२ चा कार्यक्रम जाहीर झाला आहे. मुंबई महानगरपालिकेचा प्रभाग वाढीचा आराखडा जाहीर केल्यानंतर प्रभागांची संख्या ९ ने वाढणार असून २२७ वरून ती २३६ इतकी होणार आहे. यामध्ये शहरात वरळी, परळ, भायखळा, तर पश्चिम उपनगरात वांद्रे, अंधेरी, दहिसर, आणि पूर्व उपनगरात कुर्ला चेंबूर गोवंडीत प्रभाग वाढणार आहेत. दरम्यान राज्यातील विविध जिल्ह्यातील महापालिका कार्यक्रमही जाहीर झाला आहे. यात कोल्हापूर, नागपूरसह काही जिल्ह्यांचा समावेश असणार आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २०२२ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रारुप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यासाठी आणि त्यावर हरकती व सूचना मागवण्यासाठी कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

एकूण जागांच्या ५० टक्के महिला आरक्षण असणार आहे. २३६ एकूण जागा असून खुल्या प्रवर्गासाठी ११० जागा असणार आहेत. तर १०९ जागा महिलांसाठी राखीव असतील. एसी प्रवर्गासाठी ७, एसी - ७, एसी महिला- ८, एसटी- १, एसटी महिला-१ असं आरक्षण असणार आहे. तर २०१७ च्या निवडणुकीत मुंबईत २२७ प्रभाग होते. तर,यंदा २३६ प्रभाग करण्यात आले आहे. मुंबई शहर विभागात ३, पूर्व उपनगरात ३ आणि पश्चिम ३ असे नऊ प्रभाग वाढवण्यात आले आहेत.

# इटलीच्या राष्ट्रपतीपदी मातारेला यांची दुसऱ्यांदा निवड

। रोम । वृत्तसंस्था ।
इटलीच्या राष्ट्रपतीपदी २०१५ साली विराजमान झालेले सर्जियो मातारेला दुसऱ्यांदा राष्ट्रपती म्हणून देशाचा कारभार सांभाळणार आहेत. ८० वर्षांचे मातारेला पुन्हा राष्ट्रपती होण्यास इच्छुक नव्हते. तसेच अनेक वेळेस पुन्हा निवडणूक लढवण्यास तयार नसल्याचे त्यांनी सांगितले होते. मात्र जेव्हा इटलीतील राजकीय पक्षांमध्ये एकाही नावावर सहमती न झाल्याने सर्जियो यांना राष्ट्रपती म्हणून निवडण्यास सहमती झाली.

इटलीत राष्ट्रपतीचा कार्यकाळ सात वर्षांचा असतो. भारताप्रमाणेच इटलीत ही राष्ट्रपतीची भूमिका नामधारीच असते. मातारेला हे आपला दुसरा कार्यकाळ पूर्ण करु शकणार नाही, असे सांगितले जाते. तरी एक आशा आहे की ते २०२३ मध्ये होणाऱ्या संसदीय निवडणुकापर्यंत थांबतील. सध्या ते राष्ट्रपती बनल्याने संवैधानिक संकट टळले आहे. संकट काळात बनलेले राष्ट्रपती मातारेला पूर्वी पंतप्रधान मारियो द्राघी यांना राष्ट्रपती बनवण्याचा विचार सुरु होता.

अनेक नेत्यांना भीती होती, की द्राघी यांचा सक्रिय राजकारणातून बाहेर पडल्याने कोरोनात आर्थिक नुकसान झेलत असलेल्या इटलीला अस्थिर बनवू शकतो. द्राघी पंतप्रधान होण्यापूर्वी युरोपच्या केंद्रीय बँकेचे प्रमुख होते. जवळपास १ वर्षापूर्वी सहा पक्षांच्या आघाडीने त्यांना पंतप्रधान म्हणून निवडले होते.

कर्जात बुडालेल्या इटालीला युरोपीय संघाच्यावतीने जवळपास २०० अब्ज युरोची आर्थिक मदत मिळाली होती. या मदतीचा योग्य वापर केल्याने इटलीत द्राघीला सर्वात सक्षम व्यक्ती मानले जात होते.

# बँकेतून रोकड लंपास

। चंद्रपूर । वृत्तसंस्था ।
बँक ऑफ इंडियाच्या शाखेत दिवसाढवळ्या धाडसी चोरी झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बँकेतील सर्व कर्मचारी उपस्थित असताना चोरट्यांनी तब्बल १६ ते १७ लाख रुपयांच्या रकमेवर डल्ला मारला. जिल्ह्यातील वरोरा शहरात भरदिवसा ही घटना घडली. कॅशियर ब्रांच मॅनेजरच्या केबिनमध्ये गेल्याची संधी साधून चोरट्यांनी केबिनमधील टेबलवरुन रक्कम लांबवल्याचे समोर आले आहे. पाचशे आणि दोनशे रुपयांच्या नोटांचे बंडल पिशवीत टाकून चोरांनी पोबारा केला. बँकेत असलेल्या सीसीटीव्ही कॅमेरामध्ये दोन संशयित आरोपी कैद झाले आहेत.

# वाडा येथील मीटर रीडिंग एजन्सीविरुद्ध गुन्हा दाखल

**कामात हलगर्जीपणा व महावितरणची फसवणूक**

। कल्याण । वृत्तसंस्था ।
नेमून दिलेल्या कामात हलगर्जीपणा, डिसेंबर महिन्यात ९ हजार ३३१ ग्राहकांच्या मीटरचे प्रत्यक्ष रीडिंग न करता महावितरणची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी वाडा उपविभागातील मीटर रीडिंग एजन्सीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाडा पोलीस ठाण्यात कृपासिंधू इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर या एजन्सीचे चालक श्रीकांत प्रकाश बुलकाडे याच्याविरूद्ध या गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

महावितरणच्या वाडा उपविभागातील वीज ग्राहकांच्या मीटरचे रीडिंग व वीजबिल वाटपासाठी मे. कृपासिंधू इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर या एजन्सीची १४ जून ते ३१ डिसेंबर २०२१ या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आली होती. एजन्सीने डिसेंबर महिन्यात बनावट मीटर रिडर ओळखपत्र बनवून ९ हजार ३३१ ग्राहकांच्या मीटरचे प्रत्यक्ष रीडिंग घेतले नसल्याचे आढळले.

महावितरणकडून या एजन्सीला मीटर रीडिंगसाठी प्रतिग्राहक सहा रुपयांचा मोबदला देण्यात येतो. त्यानुसार मीटर रीडिंग न घेता एजन्सीने महावितरणची ५५ हजार ९८६ रुपयांची फसवणूक केली. तसेच तर एका ग्राहकाचे मीटर रीडिंग न घेतल्याने सुमारे १८ लाख ८२ हजार ९१० रुपयांचा महसूल खोळंबल्याचे व नेमून दिलेल्या कामात एजन्सीने हलगर्जीपणा केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

कल्याण परिमंडलात कार्यरत मीटर रीडिंग एजन्सींच्या कामाची पडताळणी करण्यात येत आहे. यात चुकीच्या नोंदी किंवा अन्य गैरप्रकारांमुळे महसुलाचे नुकसान आढळल्यास संबंधित एजन्सीविरुद्ध अशीच कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे महावितरणने कळविले आहे.

**लाचप्रकरणी आयएएस अधिकाऱ्यास**

# रंगेहाथ अटक

। चंदीगढ । वृत्तसंस्था ।
केंद्रीय अन्वेषण ब्युरोने चंदीगढमधील पंजाब रोडवेजचे संचालक म्हणून कार्यरत असलेले वरिष्ठ आयएएसअधिकारी परमजीत सिंह यांना अटक केली आहे. पदोन्नतीसाठी अधिकाऱ्याच्या नावाची शिफारस करण्यासाठी दोन लाखांची लाच घेतल्याच्या आरोपाखाली ही अटक करण्यात आली असल्याची माहिती संबंधित विभागाकडून देण्यात आली आहे. सीबीआयने छापा टाकला, तेव्हा पंजाब परिवहन विभागाच्या प्रधान सचिवांकडे पदोन्नतीसाठी अधिकाऱ्याच्या नावाच्या शिफारसीकरिता परमजीत हे कथितपणे लाचेची रक्कम घेत होते.


# सह्याद्रीच्या कुशीत दडलेली 'उंबरखिंड'

संतोषी म्हात्रे

रायगड जिल्हयांच्या सीमेवर आणि सह्याद्रीच्या कुशीत दडलेली ही 'उंबरखिंड' म्हणजे भटक्यांसाठी 'हॉट डेस्टिनेशन'! या उंबरखिंडीत शिवाजी महाराजांनी मुगल सरदार कारतलब खान याच्या प्रचंड फौजेचा थोड्या मावळ्यांच्या मदतीने दारुण पराभव केला होता. उंबरखिंडीचा ट्रेक करताना इतिहासात वाचलेला महाराजांचा संघर्ष डोळ्यांसमोर उभा राहतो.

खिंड हा भौगोलिक शब्द इतिहासाशी जुळवला की, अनेक रोमहर्षक प्रसंग आपल्या डोळ्यांसमोर उभे राहतात. विशालगडाची पावनखिंड असो वा 'वेडात मराठे वीर दौडले सात'मधील नेसरीची खिंड असो, वा रायगडमधील उंबरखिंड असो.. या ऐतिहासिक खिंडींनी शिवकाळात अनेक संघर्षाचे क्षण अनुभवले. नुसतेच अनुभवले नाही तर मराठ्यांच्या हातात हात घालून शत्रूचं कंबरडं मोडण्यात मोलाची भूमिका निभावली. म्हणूनच या खिंडीचं नाव जरी निघालं तरी एक वेगळंच चैतन्य संपूर्ण शरीरात सळसळतं.जेवढा या खिंडीचा इतिहास संघर्षपूर्ण तेवढंच नयनरम्य त्याचं दर्शन!

अशाच संघर्षपूर्ण आणि शिवाजी महाराजांच्या चतुरस्त्र रणनीतीची साक्षीदार असलेली उंबरखिंड ही भटक्यांसाठी पर्वणीच ठरते. पुणे-रायगड जिल्ह्यांच्या सीमेवर आणि सह्याद्रीच्या कुशीत दडलेली ही 'उंबरखिंड' म्हणजे भटक्यांसाठी 'हॉट डेस्टिनेशन'! या उंबरखिंडीची इतिहासात एक आगळीवेगळी ओळख आहे. ती म्हणजे महाराजांनी मुघल सरदार कारतलब खान याच्या प्रचंड फौजेचा थोडया मावळ्यांच्या मदतीने केलेला दारुण पराभव. तो दिवस होता, दोन फेब्रुवारी १६६१. खानाच्या या पराभवामागे महाराजांना दूरदृष्टी होतीच; पण याहीपेक्षा उंबरखिंडीच्या भौगोलिक रचनेचा खुबीने करून घेतलेला वापर हे कारण मोठं होते. खिंडीत घडलेला हा दैदीप्यमान विजय 'याचि देही याचि डोळा' पाहायला मात्र एक दिवस तरी राखून ठेवायलाच हवा. त्यासाठी पावलं या 'समरभूमी'कडे वळवावीच



लागतात.निसर्गाचं रूप अंगाखांद्यावर खेळवणाऱ्या या 'उंबरखिंडी'चा ट्रेक करायचा असल्यास सर्वप्रथम पुणे जिल्ह्यातील लोणावळ्यात यावं लागतं. इथूनच अवघ्या सहा ते सात किलोमीटरवर असलेल्या कुरवंडे गावातूनच भल्या पहाटे या मोहिमेला सुरुवात करायची. इथून एक वाट प्रसिद्ध नागफणीच्या (ड्युक्स नोज) पायथ्यापासून निघून आयएनएस कंपाउंडच्या कडेकडेने जाते. काही कालावधीतच हे कंपाउंडसुद्धा मागे पडून तीव्र उताराची वाट सुरू होते. सध्या ही वाट पूर्णपणे बुजली असून एका तेल कंपनीच्या पाइपलाइन शेजारून मार्ग काढत जावा लागतो. उंबरखिंडीचं वैशिष्ट्य जणू या अशा अवघड आणि तीव्र उताराच्या वाटेपासूनच सुरू होतं. ही वाट उतरताना आपली होणारी दमछाक आणि तोल सावरतानाची कसरत यांचा मेळ घालतच पराभूत खानाची झालेली दुर्दशा आठवायची. त्या वेळच्या मोगल सैन्याच्या परिस्थितीची कीव करायची. कारण अशाच वाटेने उतरताना खानाचं सैन्य सोलपटून निघालं होतं. दोन-अडीच तासांत अंबा नदीच्या किनारी म्हणजे सपाटीपाशी येतो. मग मात्र मेटाकुटीला आलेल्या जीवाला थोडं हायसं वाटते. ही अंबा नदी आपला हात धरून सोबतीण राहते चावणी गावापर्यंत. इथेच नेताजी पालकरांनी सैन्याची छावणी टाकली होती. याच 'छावणी' या नावाचा पुढे 'चावणी' म्हणून अपभ्रंश झाला. इतिहासाच्या आठवणी जागवणाऱ्या या गावाशी हितगुज करायचं अन् पुढची वाट धरायची.या झाडीच्या दोन्ही बाजूला उभ्या असलेल्या टेकड्या आपल्या अभ्यासू डोळ्यांतून सुटतच नाहीत. या टेकड्यांच्या पुढच्या निमुळत्या बाजूला महाराज स्वत: सैन्य घेऊन उभे होते. मागे सह्याद्रीचा खडा कडा, अशा चिंचोळ्या वाटेतच शत्रू आपसूकच तावडीत सापडला जातो. त्याचे पुढचे काम सोप्प होऊन जाते. याच गर्द झाडीत आपल्या भिरभिरत्या नजरेला विजयस्तंभाचे दर्शन होतं. मन कृतार्थ होते.विजयस्तंभाची रचनाच मुळी मोहक. स्तंभाच्या एका बाजूला इथल्या लढाईचं वर्णन, दुसऱ्या बाजूला महाराजांचं संपूर्ण लष्करी पेहरावातील ताम्रपटात चितारलेलं मोहक रूप, त्याच्याच खाली सिंह-हत्तीच्या लढाईचं सूचक चित्र, वर ढाल तलवारी यांच्या प्रतिकृती.. आणि या सर्वाचं खडकावरच्या पाण्यात पडलेलं प्रतिबिंब.. हे सारे काही डोळ्यात साठवावं असंच. या स्तंभाशी गतकाळातल्या स्मृतींचं चिंतन करावे, त्याच्याच नजरेतून त्या वेळच्या लढाईचा प्रसंग पाहावा.अशा या विजयस्तंभाला त्रिवार मुजरा करूनच खालापूरमागे परतीची वाट धरावी.

## महत्त्वाचे

### माणगावात चार कोरोनाग्रस्त

। माणगाव । वार्ताहर ।

संपूर्ण जगात गेली वर्षभरापासून हैदोस माजविणाऱ्या कोरोना महामारीमुळे सर्वजण जेरीस आले आहेत. या महामारीची दुसरी लाट दोन महिन्यापासून आली असून रायगड जिल्ह्यात याचा प्रादुर्भाव हळूहळू वाढू लागला होता. पण सध्याची परिस्थिती पाहता मागील दोन ते तीन महिन्यापासून कोरोनाचा वेग हा हळूहळू कमी झाला होता. पण नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच रुग्णांची संख्या कमी न होता याचा वेग वाढताना दिसत आहे. माणगाव तालुक्यात दि. ३१ जानेवारी रोजी चार नवे कोरोनाग्रस्त रुग्ण आढळले असून २२ रुग्ण बरे झाले असून सध्या तालुक्यात १०७ रुग्ण बाधित असल्याची माहिती जिल्हा माहिती कार्यालयाकडून प्राप्त झाली आहे.

### गावठाण येथे सांस्कृतिक कार्यक्रम

। खांब-रोहा । वार्ताहर ।

रोहे तालुक्यातील शिवमुद्रा मित्र मंडळ गावठाण यांच्यावतीने प्रजासत्ताक दिन सोहळ्याचे औचित्य साधून सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले. गावातील लहान मुले व तरुण-तरुणी यांच्या कलागुणांना वाव मिळवण्यासाठी व त्यांच्यातील सुप्त कलागुणांना चालना मिळवण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रम प्रसंगी विशाल खांडेकर, महेश तुपकर, अक्षय निकम आदी मान्यवर उपस्थित होते.

## महिलेला जीवे मारण्याची धमकी

। माणगाव । वार्ताहर ।

महिलेला मारहाण करून ठार मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी आरोपीवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा ३० जानेवारी रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास माणगाव तालुक्यातील घोडशेतवाडी येथे फिर्यादी यांच्या घरासमोर घडला. याबाबतची फिर्याद कमल बाळाराम शिंदे (वय-६२) रा. घोडशेतवाडी ता. माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

सदर गुन्ह्याबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, घटनेतील फिर्यादी कमल बाळाराम शिंदे हे त्यांच्या घरासमोर अंगणात जेवणाची भांडी धुवत असताना यांतील आरोपी रामचंद्र गंगाराम खुटवळ रा. घोडशेतवाडी ता. माणगाव याने काही एक कारण नसताना फिर्यादी महिलेच्या पाठीमागून येऊन बांबूच्या काठीने तिच्या डोक्यात मारले.

आरोपी याने पुन्हा काठीचा वार केला असता फिर्यादी महिलेने उजव्या हाताने तो अडवला असता त्यांच्या हाताला दुखापती करून शिवीगाळी करून ठार मारण्याची धमकी दिली. या गुन्ह्याप्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार भोजकर हे करीत आहेत.

## चिरनेरला माघी गणेशोत्सव

। चिरनेर । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील चिरनेर येथे श्री गणपती देवस्थान विश्वस्त मंडळ गणपती उत्सव कमिटी व ग्रामस्थ मंडळ यांच्यावतीने माघी गणेश उत्सव साजरा करण्यात येणार असून हा उत्सव २ ते ५ फेब्रुवारी या कालावधीत साजरा होणार असून हा गणेशोत्सव कोरोनाच्या सावटाखाली साजरा केला जाणार आहे. सदर उत्सव कोरोनाच्या सावटामुळे अतिशय साध्यापणाने साजरा करण्यात येणार असून पालखी मिरवणूकीला परवानगी नाही. उत्सवात गर्दी न करण्याचे आवाहन शासकीय यंत्रणेकडून करण्यात आले आहे. उत्सवात विविध धार्मिक कार्यक्रम साजरे करण्यात येणार आहेत.

## सुकेळी खिंडीत जिवघेणे खड्डे

। गोवे -कोलाड । वार्ताहर ।

राष्ट्रीय महामार्ग १७ वरील सुकेळी खिंडीत तीव्र उतारावर प्रचंड मोठमोठे खड्डे पडले असून या खड्ड्यांतून प्रवास करतांना प्रवाश्यांना तारेवरची कसरत करावी लागते. कोणाचा जिव गेल्यानंतर सार्वजनिक बांधकाम खाते व संबंधित ठेकेदार यांना जाग येईल काय? असा संतप्त सवाल प्रवाशी वर्गातून केला जात आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील पनवेल ते इंदापूर दरम्यानचे चौपदरीकरणाचे काम गेली १२ वर्षापासून सुरु असूनही या कामात अद्यापही प्रगती नाही. याउलट पावसाळा संपून तीन महिने झाले तरी



पावसाळ्यात रस्त्याला पडलेले मोठमोठे खड्डे अद्यापही भरले गेले नाहीत याचा नाहक त्रास प्रवाशी वर्गाला होत आहे.

नागोठणेकडून खांबकडे जाणारा सुकेळी खिंडीतील चढ उतारावरील रस्ता अतिशय भयानक बनला असून या रस्त्याला पडलेले मोठ-मोठे खड्डे चढ उतारावर असल्यामुळे वाहन चालकांच्या चटकन लक्ष्यात येत नसल्याने येथे अपघाताचा धोका अधिकच वाढलेला आहे. या खड्ड्यातून

### प्रवाशी वर्गाचा संताप

प्रवास करतांना मणक्याचे आजार, कंबर दुःखी यासारखे आजाराला प्रवाशी वर्गाला सामोरे जावे लागत आहे.

या रस्त्याचे काम वाढीव निधी मिळूनही का थांबले आहे. एखादा प्रवाशी या खड्डयातुन प्रवास करतांना जखमी होऊन मृत्यू झाला तर त्याचे सर्व कुटूंब उद्ध्वस्त होते अशा घटनाही घडलेल्या आहेत. तरी या रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी जाग येईल काय? असा संतप्त सवाल प्रवाशी वर्गातून केला जात आहे.

## माजी आ. मनोहर पादीर यांना अभिवादन

। नेरळ । वार्ताहर ।

शेतकरी कामगार पक्षाचे नेते कर्जतचे पहिले आमदार मनोहर कुशाबा पादीर यांच्या पुण्यतिथीनिमित्त शहरातील असंख्य नागरिकांच्या उपस्थितीत ओलमण येथे त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

आ. मनोहर कुशाबा पादीर यांनी स्वातंत्र्य पूर्व चळवळी, आंदोलने यात सहभाग घेऊन क्रांतिकारक, हुतात्म्यांना अनेक कार्यासाठी मदत करुन स्वातंत्र्य लढ्या स्वतःला झोकून दिले होते. हुतात्मा भाई कोतवाल, हुतात्मा हिराजी पाटील यांच्या ताफ्यातील अनेकांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करुन स्वातंत्र्य लढयात सहभाग घेत होते. अशा अनेक महत्वपूर्ण कार्याची दखल घेऊन सन १९५२ च्या त्यावेळच्या कर्जत-पनवेल विधानसभेचा पहिला आमदार म्हणून त्यांची निवड करण्यात आली.



आमदारकीच्या कार्यकाळात त्यांनी आदिवासी, गरीब, जनसामान्यांसाठी उल्लेखनीय काम केले. गरीब, आदिवासी जनसामान्यांना अनेक महत्त्वपूर्ण योजना मिळवून दिल्या, अनेक मूलभूत कामे मार्गी लावली. अनेकांना तन- मन-धनाने मदत केली.प्रत्येकाच्या सुखदुः खात जाऊन धीर दिला, सहकार्य केले. जनसेवेसाठी सदैव झटणारे, कार्य करणारे आमदार मनोहर कुशाबा पादीर मात्र ऐष आरामात न राहाता शेवटच्या श्वासापर्यंत कुडामेडीच्या घरात राहत होते.

आपल्या वडिलांच्या पाऊलावर पाऊल ठेवून वडिलांच्या जनसेवा, समाज सेवा, गरीब,गरजू, अनाथ, निराधार, अंध-अपंग अशा अनेकांना अनेक माध्यमातून त्यांचे पुत्र दादा पाडीत हे समाज कार्य करीत आहेत. ओलमण येथील राहत्या घरी पुण्यतिथी निमित्त अभिवादन करण्यासाठी असंख्य कार्यकर्ते गोळा झाले होते.

## सहा मुलींची सुटका

। पनवेल । वार्ताहर ।

वेश्या व्यवसाय करण्यासाठी परराज्यातून आणलेल्या सहा मुलींची अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक गुन्हे अन्वेषण विभागाने नवीन पनवेल परिसरातून सुटका केली आहे. यामध्ये दोन मुली अल्पवयीन असल्याचे समजते. नवीन पनवेल परिसरातील सेक्टर ७ या ठिकाणी साधारण दोन महिन्यापूर्वी रो-हाऊस भाड्याने घेऊन दोन इसमांनी त्या ठिकाणी राजस्थान, उत्तरप्रदेश व दिल्ली या ठिकाणावरुन सहा मुली आणल्या होत्या. सदर मुलींना लेडीज बारमध्ये तसेच ज्या प्रमाणे गिऱ्हाईक असतील अशांकडे पाठविण्यात येत असे.

## माथेरानच्या राजकीय मंडळींचे स्वबळाचे नारे हवेतच विरणार

। माथेरान । वार्ताहर ।

सत्तेच्या मोहापायी जवळजवळ समाजकारण विसरून निवडणुका जाहीर होण्यापूर्वीच काही पक्षातील नेतेमंडळींनी कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता अगोदरच युत्या आणि आघाड्या निश्चित केल्याबाबतचे सूर ऐकावयास मिळत आहेत. त्यामुळे इथले निवडणुकीचे राजकीय घमासान चांगलेच रंगतदार होणार असून अंतर्गत मतभेद आणि गटातटाचे राजकारण आगामी काळात चव्हाट्यावर येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मागील काळात काही लोकप्रतिनिधींनी काहींना काही कारणास्तव पक्षाशी बंडखोरी केली होती आणि त्यातून या बंडखोरी करणाऱ्या लोकप्रतिनिधींना जो काही लाभ झाला होता त्याबाबतची चर्चा गावभर रंगली होती. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत सुद्धा मतदार यांच्याच कार्याची पुनरावृत्ती नक्कीच करणार आहेत असे मतदारांमधून ऐकावयास मिळत आहे. यावेळेस एकूण वीस उमेदवारांना नगरपरिषदेच्या सभागृहात प्रवेश मिळणार आहे. मार्च महिन्यात निवडणुका अपेक्षित आहेत परंतु यावेळी एकूण वीस वार्ड असल्याने मतांचे विभाजन होणार आहे. काही महिन्यांपूर्वी स्वबळावर लढण्याचे काही पक्षाच्या नेत्यांनी जाहीर केले होते तर काही पक्षाचे कार्यकर्ते आजही स्वबळावर निवडणूक लढविण्यास उत्सुक आहेत.

## गुंडगे येथे ई-श्रम कार्डचे वाटप

। नेरळ । वार्ताहर ।

असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी सरकारतर्फे चालवलेली योजना ज्यामध्ये भविष्यात या क्षेत्रातील लोकांसाठी नियोजन बद्ध धोरण आखून त्यांच्या कल्याणासाठी योजना ठरवण्यात येणार आहे. त्यासाठी सर्व असंघटीत कामगारांना ई-श्रम कार्ड महत्वाचे ठरणार आहे, ते लक्षात घेऊन इ श्रम कार्ड शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्या शिबीरात तब्बल ४४५ कामगारांची नोंदणी करण्यात आली. कर्जत शहरातील गुंडगे समाज मंदिर येथे वैशाली मोरे यांच्या माध्यमातून इ श्रम कार्ड शिबीर आयोजित केले होते.

## जेएनपीटीला हरित बंदराचा दर्जा

। उरण । वार्ताहर ।

उरण येथील जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) अनेक हरित प्रकल्प राबवीत असून देशातील बंदरासाठीच्या राबविल्या जात असलेल्या हरित बंदर उपक्रमात जेएनपीटी बंदर हरित बंदराचा दर्जा प्राप्त करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करील, असा विश्वास बंदर व्यवस्थापनाकडून व्यक्त करण्यात आला आहे.

शनिवार, २९ जानेवारी रोजी केंद्रीय बंदरे, जहाज वाहतूक व जलमार्गमंत्री सर्बानंद सोनवाल यांनी देशात हरित बंदरे आणि हरित जहाज वाहतुकीच्या विकासासाठी मेरिटाइम इंडिया व्हिजन २०३० नुसार राबविण्यात येत असलेल्या विविध हरित उपक्रमांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी सर्व प्रमुख बंदरे, सीएसएल आणि



आयडब्ल्यूएआयच्या प्रमुख अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. बैठकीत जेएनपीटीचे अध्यक्ष संजय सेठी यांनी जेएनपीटीच्या हरित बंदर उपक्रमांविषयी माहिती दिली. ''जेएनपीटीने बंदराच्या सर्व उपक्रमांचा समावेश असलेला एक कृती आराखडा तयार केला आहे, ज्यामध्ये माल हाताळणी, साठवण, निर्गमन आणि पर्यावरण जेएनपीटीच्या या कामगिरीबद्दल जेएनपीटीचे अध्यक्ष संजय सेठी यांनी बंदराचे सर्व कर्मचारी, अधिकारी व भागधारकांचे अभिनंदन केले.

## गिरीश कंटे लिखित 'आझाद दस्ता'चे प्रकाशन

। नेरळ । वार्ताहर ।

ज्ञानजिज्ञासा प्रकाशन संस्था, नेरळ यांच्या माध्यमातून गिरीश कंटे लिखित आझाद दस्ताच्या पुस्तकाची चौथी आवृत्तीचे प्रकाशन वडवली बदलापूर येथे करण्यात आले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून इतिहास संशोधक वसंत कोळंबे व लेखक अनंतराव ओगले उपस्थित होते. क्रांतिवीर हुतात्मा हिराजी यांच्या बलिदाना नंतर आणि १९४७ ला येरवडा तुरुंगातून सुटून आल्यानंतर गोमाजी पाटील यांनी आधारासाठी बिरदोले येथील गोपाळ जामघरे यांना दत्तक घेतले. अनुसयाबाई जामघरे या गोपाळ जामघरे यांच्या



पत्नी त्यांच्या हस्ते आझाद दस्ता या पुस्तकाच्या चौथ्या आवृत्तीचे प्रकाशन पार पडले.

ज्ञानजिज्ञासा प्रकाशन संस्थेने हाती घेतलेले कार्य मोलाचे आहे, असे मत वसंत कोळंबे यांनी व्यक्त केले. त्यांनी आपल्या व्याख्यानात 'आझाद दस्ता'च्या क्रांतीलढ्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाला स्वातंत्र्यसैनिक गोमाजी पाटीलचे अध्यक्ष कल्पेश भोईर, प्रा. शिक्षक दिपक घिगे, प्रा. हरेंद्र सोष्टे, प्रा. विजय कोंडीलकर, स्वातंत्र्यसैनिक झिपरु गवळी यांचे पुतणे वामन गवळी, प्रा. महेश मोरे, यशवंत माळी तसेच ज्ञानजिज्ञासा प्रकाशन संस्थेचे नागेश धावडे, प्रदिप मोगरे, विक्रम विरले आदी उपस्थित होते.

## सिताराम घनदाट यांना कोरोना

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

अभ्युदय बँकेचे मानद अध्यक्ष सिताराम घनदाट यांची कोव्हिड चाचणी पॉझिटिव्ह आली आहे. ते नवी



मुंबईतील अपोलो हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय देखरेखीखाली आहेत. त्यांची प्रकृती स्थिर आहे. यांनी विनंती केली आहे की, गेल्या आठवडाभरात त्यांच्या संपर्कात आलेल्या सर्वांनी स्वतःची चाचणी करुन घ्यावी आणि आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

## शालेय विद्यार्थ्यांसाठी रक्त तपासणी

। रसायनी । वार्ताहर ।

वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायत हद्दीतील शिवनगर येथील राजिप शाळेतील विद्यार्थ्यांची रक्त गट तपासणीसह इतर तपासण्या व्हाव्यात यासाठी लाईफकेअर डायग्नॉस्टीक सेंटर यांच्यामार्फत कै. स्वप्नील पाटील यांच्या जयंतीनिमित्त रा.जि.प.शाळा शिवनगर येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी व वाडीतील इतर रहिवाशांसाठी रक्तगट तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

सदर शिबिराचा १५० विद्यार्थी व आसपासच्या आदिवासी बांधवांनी लाभ



**|| लाईफकेअर डायग्नॉस्टीक सेंटरचे विशेष सहाय्य**

घेतला. सर्जेराव पाटील, विनायक गायकवाड, तृप्ती पाटील, संदेश गायकवाड, प्राची माळी यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. यावेळी संदिप मुंढे, संतोष पाटील आदी उपस्थित होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ WORK FROM HOME ९५०३०५८६२४

■ ड्रायव्हर हवा आहे. Pickup/407 टेम्पोवर अनुभवी ड्रायव्हर हवा आहे. १४०००/१५००० गोविंद गोपाळ अँड कंपनी झिराड- ८००७८९३२३२/९४२१९५४३४८

■ अलिबागमध्ये कॉटेजसाठी (कूक),दुकानात व एजन्सीमध्ये काम करण्यासाठी हुशार मेहनती माणूस हवा आहे. संपर्क- ९२२२६९६२३५

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## चिमुरडीला मिळाले तिचे माता पिता

### ४ वर्षांची अज्ञात मुलगी महामार्गावर एकटीच, पालकांचा निष्काळजीपणा उघड

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

रायगड जिल्ह्यातील मुंबई-गोवा महामार्गावर रामवाडी येथील एस.टी. महामंडळाच्या विभागीय कार्यशाळेत कामगार म्हणून कार्यरत असणारे अरबाज अजीज शिलोस्कर हे आपली ड्यूटी संपून घरी जाण्यास येत असताना त्यांना एक ४ वर्षांची अज्ञात मुलगी महामार्गावर एकटी सापडली.

काहीशी भेदरलेली व सैरवैर धावणारी ही चिमुरडी अरबाजच्या नजरेत आली. यावेळी एस.टी चे कर्मचारी शिलोस्कर यांनी समयसूचकता दाखवत त्या मुलीची विचारपूस केली असता तिला काही बोलता येईना, अशा वेळी त्यांनी रामवाडी गावात जाऊन प्रत्येक घरी मुलीची ओळख पटवून घेण्याचा प्रयत्न करीत असताना एका घरी अज्ञात मुलीचे वडील सापडले व ती व्यक्तीच त्या मुलीचे खरे वडील आहेत का



याची देखील खात्रीपूर्वक चौकशी त्यांनी त्यांच्या घराच्या शेजारी राहणाऱ्या व्यक्तीकडून करून घेतली.

त्यानंतरच त्यांनी त्या लहान मुलीला तिच्या आई वडिलांच्या स्वाधीन केले



तसेच पालकांना समज देऊन आपल्या पाल्याची काळजी घ्यावयास सांगितले. सध्या लहान मुलांना पळवणारी टोळी सक्रिय झाली असून बालकांचे होणारे अपहरण, अत्याचाराच्या घटना घडत असल्याच्या बातम्या रोज कानी पडत असून समस्त पालकांनी आपल्या पाल्याची काळजी घेऊन सतर्कतेने राहण्याचे आवाहन शिलोस्कर यांनी केले आहे.

दरम्यान काही दिवसांपूर्वी पेण तालुक्यात मुले चोरणारी टोळी सक्रिय झाल्याची व्हिडीओ बातमी समाजमाध्यमांवर फिरत होती, अशातच आईवडिलांनी आपल्या मुलांवर लक्ष ठेवावे, मुले कुठे जातात कुठे खेळतात, यावर बारीक लक्ष ठेवावे अन्यथा कोणतीही दुर्घटना घडण्याची शक्यता सुजाण व ज्येष्ठ नागरिक व्यक्त करीत आहेत.

# मातृभाषेचे संवर्धन निजभाषिकांची जबाबदारी



## सुगत गमरे यांचे प्रतिपादन

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

मातृभाषेचे संवर्धन करणे ही निजभाषिकांची जबाबदारी आहे. आपल्या मराठी भाषेला वैभव आणि प्रतिष्ठा प्राप्त करुन देण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे. त्यामुळे तिची जोपासना व संवर्धन करणे, ही सर्वांचीच जबाबदारी असल्याचे प्रतिपादन महापारेषणचे संचालक सुगत गमरे यांनी केले आहे.

महापारेषण कंपनी सांघिक कार्यालयाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, यापैकी वक्तृत्त्व स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर महापारेषणचे संचालक अशोक फळणीकर, संचालक नसीर कादरी, कार्यकारी संचालक श्रीकांत राजूरकर, मुख्य महाव्यवस्थापक संतोष आंबेरकर, मुख्य महाव्यवस्थापक सुधीर वानखेडे, मुख्य महाव्यवस्थापक तथा महाव्यवस्थापक राजू गायकवाड, मुख्य अभियंता संजीव भोळे, संदीप कलंत्री उपस्थित होते.

याशिवाय आयोजित विविध मार्गदर्शनपर कार्यक्रमांमध्ये 'मराठी भाषा संवर्धनाचे महत्त्व' या संदर्भात प्रसिध्द लेखिका, निर्माती, नाट्य व सिनेकलाकार श्रीमती मुग्धा गोडबोले यांची मुलाखत महापारेषणचे संचालक सुगत गमरे व नाट्यकलाकार मयुरेश साने यांनी घेतली. तर मराठी भाषेचे सरकारी कामकाजातील महत्त्व, मराठी बोलीभाषा व साहित्य, मराठी भाषा दिन गरज आणि महत्त्व, मराठी भाषेची चळवळ व आव्हाने या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेत आसावरी तुलसी यांनी प्रथम क्रमांक, पारस सवाई यांनी द्वितीय क्रमांक तर गौतब कांबळे यांनी तृतीय क्रमाकांचे यश संपादित केले. या विजेत्यांना प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह यासह अनुक्रमे दहा हजार, सात हजार आणि पाच हजार रुपयांचे रोख पारितोषिक वितरित करण्यात आले. या स्पर्धेसाठी परीक्षक किशोर महाबोले, विजय टाकळे, मयुरेश साने यांनी काम पाहिले. तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, उपमहाव्यवस्थापक तथा मराठी भाषा अधिकारी नितीन कांबळे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यवस्थापक (मा.सं.) महेश आंबेकर यांनी तर आभारप्रदर्शन भरत पाटील यांनी केले.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


# ऐश्वर्यज्वेलकलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


# महत्वाचे

## मंदिरात चोरी

। पनवेल । वार्ताहर ।

खारघर येथील एका मंदिराची दानपेटी फोडून, अज्ञात चोरट्यांनी लाखो रुपये चोरुन नेल्याची घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. खारघर येथे असलेल्या इस्कॉन मंदिरात ही चोरी झाली असून, या घटनेची माहिती मिळताच खारघर पोलीस घटनास्थळी रवाना होत पुढील कारवाईस सुरुवात केली आहे. परिसरात असलेले सीसीटीव्ही आदींच्या माध्यमातून या अज्ञात चोरट्यांचा शोध खारघर पोलीस करीत आहेत.

## मद्यसाठा हस्तगत

। पनवेल । वार्ताहर ।

तालुक्यातील कोप्रोली गावाच्या हद्दीत बेकायदेशीररित्या देशी-विदेशी मद्याचा साठा करून, त्याची विक्री करणाऱ्या एका इसमाविरोधात पनवेल तालुका पोलिसांनी गुन्हा दाखल करून, त्याच्याकडून हजारो रुपये किंमतीचा मद्यसाठा हस्तगत केला आहे. किरण पाटील असे या आरोपीचे नाव असून, हा बेकायदेशीररित्या देशी-विदेशी मद्यसाठा करून त्याची विक्री करीत असल्याची माहिती वरिष्ठ पोलीय निरीक्षक रवींद्र दौंडकर यांना मिळली होती. यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून त्या ठिकाणी जवळपास ६ हजार ७६० रुपये किंमतीचा देशी-विदेशी मद्याचा साठा हस्तगत केला आहे.

## आश्रमातून मनोरुग्ण महिला बेपत्ता

। पनवेल । वार्ताहर ।

तालुक्यातील वांगणी सिल आश्रम येथून एक मनोरुग्ण महिला बेपत्ता झाली असून, याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे. पत्तु देवीनायकम (४५) असे या महिलेचे नाव असून, दाखल फियार्दीनुसार, रंग काळा, टक्कल केलेला, डोक्याच्या उजव्या बाजूला मोठी जखम, त्यावर टाके घातलेले, उंची ५ फुट, अंगात सलवार कमीज असे या महिलेचे वर्णन असून, तिला तामिळ भाषा बोलता येते. तरी या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे (दूरध्वनी २७४५२४४४) किंवा पोलीस हवालदार अमोल कांबळे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### ग्रुप ग्रामपंचायत शहाबाज
### मु.पो.शहाबाज, ता.अलिबाग, जि.रायगड
### अल्प मुदतीची निविदा सूचना

ग्रा.पं.शहाबाज ता.अलिबाग जि.रायगड येथील खालील कामे सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा २ रा.जि.प.अलिबाग २०२१/२२ निधीतुन हाती घेतले आहे. तरी सदर कामे करणेसाठी नोंदणीकृत/अनुभवी ठेकेदारांकडून मोहोरबंद लिफाफा निविदा मागविणेत येत आहे.

| अ क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | काम पूर्ण करणेचा कालावधी | निविदा सादर करण्याची अंतिम तारीख ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय सादर | इसारा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वालवर्ड येथे प्लॉस्टिक वेस्ट स्टोअरेज-३ सार्वजनिक लिचपीट बांधणे-२ | ८६५९७ | ३ महिने | १०/०२/२०२२ | ८६६ | १०० |
| २ | घसवड येथे प्लास्टिक वेस्ट स्टोअरेज बांधणे ६ व सार्वजनिक लिच पीट ३ | १३९२१४ | ३ महिने | १०/०२/२०२२ | १३९२ | १०० |
| ३ | तळबंद येथे प्लॉस्टिक वेस्ट स्टोअरेज बांधणे ५ व सार्वजनिक लिच पीट ३ | १३३००३ | ३ महिने | १०/०२/२०२२ | १३३० | १०० |
| ४ | शहाबाज येथे कंपोस्ट पीट बांधणे ४ व प्लॉस्टिक वेस्ट स्टोअरेज बांधणे ७ व सार्वजनिक लिच पीट बांधणे १६ ट्रॉयसायकल खरेदी करणे | ७१०६३२ | ३ महिने | १०/०२/२०२२ | ७१०६ | १०० |

अटी :-
१.कामाचे अंदाजत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेस पहावयास मिळतील व आवश्यक असल्यास फी भरून प्रत दिली जाईल.
२.प्राप्त निविदा दि.११/०२/२०२२ रोजी सायं ४.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात येथे उपस्थितांचे समक्ष मा.सरपंच यांचे हस्ते उघडणेत येतील.
३.कोणतीही एक अथवा अनेक विविध कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
४.देयकातून शासन नियमाप्रमाणे आयकर, विमा जीएसटी सुरक्षा अनामत, सेस व उपकरांची रक्कम कपात केली जाईल. पंचायत समिती अलिबाग यांचेकडील तांत्रिक अधिकारी व ग्रामपंचायतीचे पदाधिकारी/सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदरची कामे करणेचे असून काम समाधानकारक नसेल तर ते त्याच स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे.
५.काम अंतिमरित्या पुर्ण झालेनंतर सहा महिन्यानंतर संबंधित ठेकेदार यांना सुरक्षा अनामत परत केली जाईल.
६.प्राप्त मूल्यांकन नुसार उपलब्ध निधीप्रमाणे रक्कम अदा केली जाईल
७.निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
८.निविदा फॉर्म फी ना परतावा समजावी.
९ निविदा मंजूर केल्यास १०० रू स्टॅम्प पेपरवर करारनामा स्वखर्चाने करुन द्यावा लागेल.

ग्रामविकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत शहाबाज — सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत शहाबाज

### ग्रामपंचायत कुरूळ
### ता.अलिबाग, जि.रायगड
### जाहीर निविदा सूचना

दिनांक : ०२/०२/२०२२ जा.क्रमांकः- /२०२१/२२

ग्रामपंचायत कुरूळ हद्दीतील खालील ग्रामनिधी व १४ वा वित्त आयोग निधी अंतर्गत मागविण्यात येणाऱ्या विकास कामाच्या निविदा व साहित्य पुरवठा सिलबंद निविदा (दरपत्रक) दि.०२/०२/२०२२ ते ०९/०२/२०२२ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत (सुटट्टीचे दिवस वगळून) ग्रामपंचायत कार्यालयात समक्ष अगर टपालाने मोहरबंद स्वरूपात पोहचतील अशा स्वरूपात पाठविण्यात याव्यात उशिरा आलेली निविदा व दरपत्रक स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र | कामाचे नाव | लेखाशिर्ष | वर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कुरूळ येथील तलावा जवळील शंकराचे मंदिर दुरूस्त करणे. | ग्रामनिधी | २०२१/२२ | २,९९,०००/- | २९९०/- | ३ महिने |
| २. | ग्रामपंचायत इमारतीस फर्निचर तयार करणे. | १४ वा वित्त आयोग | २०१७/१८ | १,००,०००/- | - | २ महिने |

अटी व शर्ती
१.वरील कामापैकी क्रमांक १ च्या कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत ग्रा.प.कार्यालयात पहावयास मिळेल.
२.वरील कामांपैकी क्रमांक २ च्या कामाचे दरपत्रक स्वतंत्रपणे सिलबंद लिफाफ्यात सादर करावे.
३.ठेकेदाराची नोंदणी ग्रामविकास विभाग/जिल्हापरिषदेकडे झालेली असणे आवश्यक आहे. त्याबाबत वैध प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.
४.निविदा व दरपत्रक स्विकारण्याचा अंतिम कालावधी दिनांक ०९/०२/२०२२ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत राहील. उशीरा आलेल्या निविदेचा व दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.
५.दिनांक १४/०२/२०२२ रोजी सायं ४.०० वा मा.सरपंच यांच्या समक्ष निविदा व दरपत्रक उघडण्यात येतील.
६.नामंजूर निविदा व दरपत्रकाबाबत कळविले जाणार नाही याची नोंद घ्यावी.
७.कोणतीही एक अथवा अनेक निविदा व दरपत्रक कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कुरूळ, ता.अलिबाग, जि.रायगड — सरपंच, ग्रामपंचायत कुरूळ, ता.अलिबाग, जि.रायगड

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली जमिन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मौजे वाकणगाव, ता.सुधागड, जि.रायगड, येथील जमिन मिळकत**
**मिळकतीचे वर्णन**

| जमिन मालकाचे नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.मानव धर्मेंद्र पाटील | १०७ | १-२८-०० पैकी ०-२०-०० | ०-५९ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन, जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याचप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक : ०२/०२/२०२२
खरेदी घेणार- श्री.विनायक विठ्ठल जाधव
रा.खडकआळी, पाली, ता.सुधागड, जि.रायगड
मो.९३२२५५४७३२

सही/-
खरेदीदारांचे लेखक,
**श्री.सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,**
६९९ जमना निवास, पाली ता.सुधागड, जि.रायगड.
मो.९४२११६८७६३/९२७०३६७२९०

### हरकत नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटिसी मार्फत कळविण्यात येते की, आमचे अशिल **श्रीमती हेमलता बाळकृष्ण पार्टे** रा.ठाणे जि.ठाणे

आमच्या अशिलांच्या मालकीची व एकत्र कुटुंबाची मिळकत मौजे बामणसुरे व मौजे चोंढी ता.अलिबाग, जि.रायगड येथे असून सदर मिळकतीचे विस्तृत वर्णन खालीलप्रमाणे-

| मौजे | सर्व्हे नं. गट नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| बामणसुरे चोंढी | ५९ | ०-५२-०० | १.४४ |
| | ५/३/८ | १०-४०-०० | १०४.०० |
| | ५/१ | ०-१२-८० | ०.५५ |

वरील वर्णनांकित मिळकतीवर मा.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर अलिबाग यांचे न्यायालयात रेग्यु.मुकदमा क्र.१४८/२०१२ दाखल असून सदर दावा आमच्या अशिलांनी दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे काम अद्याप प्रलंबित असून सदर मिळकत हि न्यायप्रविष्ठ आहे. सदर वर उल्लेखीत मिळकत त्रयस्थ इसमांस विकण्याचा प्रयत्न सुरु असल्याचे आमचे अशिलांच्या निदर्शनास आले आहे. सबब सदर जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारास आमच्या अशिलांची सक्त हरकत राहिल. या उपरही वर उल्लेखीत मिळकतींचा कसलाही कुठलाही व्यवहार उदा.खरेदी, विक्री, साठेकरार, बक्षिसपत्र, अखत्यारपत्र, गहाणखत वगैरे अन्य कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. या उपरही कोणीही सदर मिळकती संदर्भात कसल्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नसून सदर व्यवहारास आमचे अशिलाची सक्त हरकत राहील. यांची याद्वारे सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
**दिनांक : ०१/०२/२०२२**

सही/-
**ॲड.विक्रांत विनायक पाटील**
म्हात्रोळी-अलिबाग,जि. रायगड
मो.नं.८३२९४६१५४०/९२८४६४५९१८

---

ने.ता.२१/०२/२०२२
अर्जदारातर्फे ॲड.अभिजित बाळाराम पाटील

### जाहीर नोटीस

**अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो.यांचे कोर्टात**
दिवाणी चौकशी अर्ज क्र.०१/२०२२
नि.७/ड

१) श्री.संदिप रघुनाथ ठाकूर
वय ५३ वर्षे, धंदा-व्यवसाय
२) कु.संस्कार संदिप ठाकूर,
वय १४ वर्षे, धंदा-शिक्षण,
३) कु.सई संदिप ठाकूर,
वय १३ वर्षे, धंदा-शिक्षण,
सर्व रा.ॲकॉन्स बिल्डींग, फ्लॅट नं.१०३
जिल्हा न्यायालयासमोर, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड
अर्जदार नं.१ स्वतःकरीता व
अर्जदार नं.२ व ३ चे
अपाक वडील म्हणून — अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही — सामनेवाला

सदर जाहीर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार हे वरील पत्त्यावर राहत असून अर्जदार क्र.१ पत्नी व अर्जदार क्र.२ व ३ यांची आई कै.सानिका संदिप ठाकूर यांचे वारस असलेबाबत जाहीर करून मिळणेकरीता मे.कोर्टात तसा वारसा दाखला मिळणेकरीता अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२१/०२/२०२२ रोजी पर्यंत मे.न्यायालयात हजर राहून आपली तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.
आज दिनांक ३१/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- **कनिष्ठ लिपिक, सि.ज.सि.डी.अलिबाग-रायगड** (कोर्टाचा शिक्का) सही/- **कनिष्ठ लिपिक, सि.ज.सि.डी.अलिबाग-रायगड**

### शुध्दीपत्रक

याद्वारे हाशिवरे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.हाशिवरे, ता.अलिबाग, जि.रायगड या संस्थेचा सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेच्या सन २०२१-२०२२ ते सन २०२६-२०२७ या कालावधीचा निवडणूक कार्यक्रम दिनांक २८ जानेवारी २०२२ रोजी 'दैनिक कृषीवल' या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेला आहे. या प्रसिध्द केलेल्या निवडणूक कार्यक्रमामध्ये तिसऱ्या ओळीत टंकलेखनाच्या चुकीने कुसूंबळे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.कुसूंबळे या नावाचा उल्लेख झालेला आहे. त्या ऐवजी सदरचे नाव हाशिवरे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.हाशिवरे असे वाचण्यात यावे.

तसेच निवडणूक कार्यक्रमांतील कॉलम नं.९ मध्ये टंकलेखनाच्या चुकीमुळे मतदान ज्या तारखेस घेण्यांत येईल तारीख वेळ या मध्ये स्थळ जिल्हापरिषद शाळा कुसुंबळे असे झाले आहे त्याऐवजी स्थळ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हाशिवरे असे वाचण्यांत यावे.

सही/-
**जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी**
**तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे धोकवडे, ता.अलिबाग,जि.रायगड येथील भुमापन क्र.४०७, एकूण क्षेत्र ०-३९-२० हे.आर. आकार ०८ रुपये ०६ पैसे, ही भातशेती मिळकत मिळकतीचे विद्यमान कब्जेदार श्रीमती पुष्पलता रविंद्र पाटील वगैरे २१ यांचे खुद्द मालकीची व ताबा कब्जा वहिवाटीची असून सदर मिळकत माझे आशिलांनी मिळकतीचे वरील विद्यमान कब्जेदार यांजकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा करार माझे अशिल व मिळकतीचे विद्यमान कब्जेदार यांच्यात झालेला आहे. सदर मिळकतीची मालकी व ताबा कब्जा सदरील विद्यमान कब्जेदार यांचाच आहे. असा भरवसा त्यांनी माझे अशिलांस दिलेला आहे. तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, साठेकरार, अन्न वस्त्राचा बोजा, वहिवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून पंधरा दिवसांचे आत खालील सही करणार खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट यांजकडे प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वर वर्णन केलेल्या मिळकतीचा मालकी हक्क व ताबा कब्जा वरील विद्यमान कब्जेदार यांचाच आहे असे समजून माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
**ता.१/०२/२०२२**

सही/-
**ॲड.श्रद्धा प्रदिप वैद्य**
नागेश्वर भुवन, गणपती आळी,
मु.पो.नागांव,ता.अलिबाग, जि.रायगड
(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)

### जाहीर नोटीस

आमचे अशिल दि.रायगड नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग कार्यालय पाध्येवाडी अलिबाग यांचे माहितीवरून व सुचनेवरून सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल या पतसंस्थेमध्ये वैभव हेमंत कनगुटकर, रा.गोंधळपाडा यांची आई श्रीमती निलम हेमंत कनगुटकर यांचे नावे हा ईसम पिग्मी एजंट म्हणून सन २०१३ पासून काम करत होता. २०१८ साली त्याने पिग्मी खात्यामध्ये गैरव्यवहार केल्याचे आमचे अशिलाचे निदर्शनास आल्यावर आमचे अशिलांनी त्याबाबत त्यास जाब विचारला असता त्याने चुक कबुल करून त्यांने स्वतः व पिग्मी एजंट म्हणून आईचा फेब्रुवारी २०१८ मध्ये राजिनामा दिला त्यानंतर सदर वैभव कनगुटकर यांचा आमचे अशिल पतसंस्थेबरोबर कोणताही संबंध राहिलेला नव्हता व जे जुने खातेदार होते त्यांनाही त्यांची जमा असलेली रक्कम परत केली होती. याबाबत त्यांनाही या गोष्टीची कल्पना होती दरम्यान सदर इसम वैभव हेमंत कनगुटकर याने त्यांचे राहते घरी दि.२७/०१/२०२२ रोजी आत्महत्या केली. त्यानंतर काही इसम आमचे अशिलांचे कार्यालयातून येवून आमचे अशिलांकडे श्री.वैभव कनगुटकर यांनी संस्थेचा संबंध नसताना परस्पर उघडलेल्या तथाकथित खात्याबाबत चौकशी करू लागले त्या सर्व ईसमांना सदर वैभव हेंमत कनगुटकर यांने आमच्या संस्थेचा नावाचा गैरवापर करून खोट्या पावत्या कार्डस् व एफ.डी.रिसिप्ट तयार केल्याचे आमचे अशिलांचे निदर्शनास आलेले आहे. त्याबाबत सर्वांस आमचे अशिल या पतसंस्थेमार्फत कळविण्यात येते की, सदर इसम हे वैभव हेमंत कनगुटकर याचा आमचे अशिल या पतसंस्थेबरोबर फेब्रुवारी २०१८ नंतर कोणताही संबंध राहिलेला नव्हता व तो आमचे अशिल पतसंस्थेकरीता कोणतेही काम करीत नव्हता. त्यामुळे वैभव हेमंत कनगुटकर यांनी परस्पर उघडलेले पिग्मी खाते, आर. डी.खाते आणि एफ.डी.खात्यांशी आमचे अशिलांचा कोणताही संबंध नाही हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दि.०१/०२/२०२२

सही/-
**ॲड.आर.बी.कोसमकर**
चिरायु, ब्राम्हणआळी, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पाझर ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती त्यांच्या विद्यमान मालकांकडून सर्व हक्कांसहीत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व सदर मिळकत निर्वेध असल्याची खात्री मालकानी दिलेली आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| अनु. | गट क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | विद्यमान मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | २३ | ०-३८-१० | २.३२ | श्री.विश्वनाथ पांडूरंग गोंधळी |
| २ | ४४७ | ०-०५-२० +पो.ख.०-००-१० | १.२८ | श्री.विलास शांताराम नाईक |
| ३ | ४२९ | ०-०७-१० +पो.ख.०-०१-५० | १.६९ | श्री.प्रभाकर धर्मा नाईक |

वरील मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क अधिकार अगर खरेदी, साठेकरार, दान, पोटगी, वाटप, मृत्युपत्र, कुळहक्क, दावा, वहिवाट, अगर इतर कोणताही बोजा अगर हक्क असल्यास त्यानेही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत कोणाचीही तक्रार, हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध मालकीची व बोजारहीत आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व नंतर येणाऱ्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहणार नाहीत ही नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०१/०२/२०२२

सही/-
**ॲड.महेश एस म्हात्रे**
ऑफीस नं.१, शिवराम भास्कर बिल्डींग,
बाजारपेठ रोड, केळकर नाका,अलिबाग
मो नं.- ९२२६८४७०७७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांच्या खालील वर्णनाच्या मिळकती मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून सर्व हक्कांगासह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| कार्ले ता.अलिबाग | ३३३/१ | ०-१४-४० पो.ख.०-०४-५० एकूण ०-१८-९० | १.४० | इंदिराबाई शांताराम भगत मु.कार्ले पो.खंडाळे, ता.अलिबाग, जि.रायगड |
| | ३३३/३ | ०-१४-०० पो.ख.०-०४-३० एकूण ०-१८-३० | १.३७ | |

वर नमूद मिळकतींचा साठेकरार मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांच्या लाभात स्वाक्षरीत करून दिलेला आहे. सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख :- ०१/०२/२०२२

**(ॲड.संजय द.म्हात्रे)**
सितास्मुती, आगरसुरे, पो.चोंढी
ता.अलिबाग, जि.रायगड

### जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते ते खालीलप्रमाणेः-

ज्या मिळकतीच्या संदर्भात जाहीर नोटीस देण्यात येते त्या मिळकतीचे सर्वसाधारणपणे वर्णन खालीलप्रमाणे.

मौजे वरसोली, ता.अलिबाग जि.रायगड

गट क्र.९०, हिस्सा क्र.२, (पूर्वीचा गट क्र.९०, हिस्सा क्र.२) क्षेत्र (हे. आर.) ०-०६-२४, आकार (रू.पैसे) ६२.४० ही बिनशेती मिळकत

त्यावर असलेली भातगिरणी साठी असलेली शेड अशी मिळकत श्री.सुरेंद्र माधव जोशी यांचे मालकीची आहे. सदर मिळकतीच्या पूर्वेच्या दिशेस असलेली गट क्र.८१, हिस्सा क्र.४, क्षेत्र ०-०४-०, आकार(रू.पैसे)१.०० ही मिळकत कै.माधव वामन जोशी व श्री.संजीव माधव जोशी यांचे मालकीची असून त्याप्रमाणे ७/१२ दप्तरी दाखल आहे.

गट क्र.९०, हिस्सा क्र.२, या मिळकतीचे पूर्वेच्या दिशेस असलेली गट क्र.८१ ही मिळकत श्री.सुरेंद्र माधव जोशी स्वतःचे मालकीची आहे असे भासवून सदरहू मिळकत विकण्याच्या तयारीत आहे अशी आमच्या अशिलांना खात्रीलायकरीत्या माहिती मिळालेली आहे. वस्तुस्थितीप्रमाणे गट क्र.९०, हिस्सा क्र.२ या मिळकतीस जाणे येणेकरीता कोणताही स्वतंत्र रस्ता नाही. तसेच गट क्र.९०, हिस्सा क्र.२ या मिळकतीच्या चारही दिशेस आमच्या अशिलांच्या नावे व हिश्श्यास असलेल्या मिळकती आहेत.

त्याचप्रमाणे गट क्र.९०, हिस्सा क्र.२, या मिळकतीचे संदर्भात आमचे अशिल श्री.संजीव माधव जोशी अलिबाग येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयांत स्पेशल मुकादमा क्र.१००/२०२१ असा दावा दाखल केलेला असून तो प्रलंबित आहे. तरी सर्व जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, गट क्र.९०, हिस्सा क्र.२ या मिळकतीचे संदर्भात कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदीचा किंवा तत्सम प्रकारचा व्यवहार करू नये.

अलिबाग
दिनांक : ०१/०२/२०२२

सही/-
**ॲड.सचिन बा.जोशी**
रा.साई लिला बिल्डिंग, २ रा मजला, श्रीबाग क्र.२
कुमठेकर हॉस्पिटल जवळ,अलिबाग,
अलिबाग- रायगड
भ्रमणध्वनी क्र-९८२२६५३६५५

# सायकल वाटपातून शैक्षणिक प्रगती उंचावेल

**शेकाप नेत्या चित्रलेखा पाटील यांचा उपक्रम**
**आ. जयंत पाटील यांच्या हस्ते वाटप**

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

नारंगीपरिसरातील विद्यार्थीनींना शैक्षणिक प्रगतीसाठी शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांच्या वतीने शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांच्या हस्ते सायकलींचे वाटप करण्यात आले.

यावेळी मान्यवरांनी चित्रलेखा पाटील यांच्या उपक्रमाचे कौतुक करीत या उपक्रमामुळे या परिसराची शैक्षणिक प्रगती निश्चित उंचावेल असा विश्वास व्यक्त केला.

याप्रसंगी माजी मंत्री मीनाक्षी पाटील, माजी आ. पंडित पाटील, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा गटनेते ॲड.आस्वाद पाटील, जिल्हा परिषद सदस्य भावना पाटील, पंचायत समितीचे सभापती प्रमोद ठाकूर, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, मारुती पाटील, नारंगीच्या सरपंच स्मिता पाटील, उपसरपंच अमोल पाटील, नारंगी विद्यालयाचे हितचिंतक अशोक हिरामत, चित्रलेखा हिरामत, विकास काकवानी, लिना काकवानी, पेझारीचे उपसरपंच ॲड. मनोज धुमाळ, गटविकास अधिकारी साळावकर, माजी सभापती कुंदा गावंड आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना आ. जयंत पाटील म्हणाले की, रायगडच्या जनतेचा शैक्षणिक उद्धार नाना पाटील यांनी केला, तीच परंपरा शेकापक्षाची पुढील पिढी कायम ठेवत आहे. महिलांना जास्तीत जास्त शिकवण्याची गरज आहे. चित्रलेखा पाटील यांनी अतिशय स्तुत्य उपक्रम राबविला असून, त्यासाठी काटेकोरपणे त्या मेहनत घेत कुठलाही राजकीय हस्तक्षेप न ठेवता काम करीत असल्याबाबत त्यांनी कौतुक केले. तर चित्रलेखा पाटील यांनी आपल्या मनोगतात शाळेतील विद्यार्थीनींची गळती थांबविण्यासाठी सायकल वाटपातून मदत होईल असा विश्वास व्यक्त केला. संपूर्ण महाराष्ट्रभर एक लाख सायकलींचे वाटप करुन त्यामाध्यमातून शिक्षणात बदल घडविण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचेही त्या म्हणाल्या. सायकल वाटपातून शिक्षणाचा दर्जा वाढत असल्याचेही त्यांनी सांगितले.



चित्रलेखा हिरामत यांनी देखील चित्रलेखा पाटील यांच्या उपक्रमाचे कौतुक करताना सायकल वाटपातून शैक्षणिक प्रगती उंचावेल असा विश्वास व्यक्त केला. निवेदन वेदांत कठंक यांनी केले.

कार्यक्रमासाठी गाव अध्यक्ष प्रमोद पाटील, रांजणखार गाव अध्यक्ष संजय पाटील, नरेश म्हात्रे, सविता धुमाळ, शिल्पा म्हात्रे, राजेंद्र म्हात्रे, अनिल धुमाळ, राहूल पाटील, स्वप्निल म्हात्रे, माजी सरपंच विनोद पाटील, मंगेश म्हात्रे, वर्षा पाटील, अमृता म्हात्रे आदींनी परिश्रम घेतले.

## म ह त्त्वा चे

### कोहली फलंदाज म्हणून छाप पाडण्यास उत्सुक

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।



संघाला प्रगतीची दिशा दाखवण्यासाठी तुम्ही कर्णधार असणे गरजेचे नाही. त्यामुळे आता अनुभवी खेळाडू म्हणून युवा क्रिकेटपटूंना मार्गदर्शन करण्यासाठी तसेच फलंदाज म्हणून संघाच्या विजयात अधिकाधिक योगदान देण्यासाठी मी सज्ज आहे, अशी प्रतिक्रिया भारताचा माजी कर्णधार विराट कोहलीने व्यक्त केली. कोहलीने आफ्रिकेविरुद्धच्या मालिका पराभवानंतर भारताच्या कसोटी संघाचे कर्णधारपद सोडण्याचा निर्णय घेतला. त्यापूर्वी डिसेंबरमध्ये त्याची एकदिवसीय संघाच्या नेतृत्वपदावरूनही हकालपट्टी करण्यात आली. गेल्या दोन वर्षांहूनही अधिक काळ ३३ वर्षीय कोहली एकही शतक झळकावू शकलेला नाही. संघाला प्रगतीच्या वाटेने नेण्यासाठी तो सातत्याने पुढाकार घ्यायचा. त्याचप्रमाणे आता मी कर्णधारपदावरून पायउतार झाल्यामुळे संघहिताच्या दृष्टीने घेण्यात येणाऱ्या निर्णयांमध्ये माझे योगदान नसेल, असे मुळीच नाही,'' असे कोहली एका ऑनलाइन कार्यक्रमादरम्यान म्हणाला. ''फलंदाज म्हणून मी संघासाठी अधिक चमकदार कामगिरी करू शकतो. खेळाडू म्हणून तुम्हाला प्रत्येक भूमिका बजावता येणे गरजेचे आहे.

## श्री गणेश गोवे आयोजित क्रिकेट स्पर्धेत
# सोमजाई गोवे संघ विजेता

। गोवे-कोलाड । वार्ताहर ।

गोवे-खांब ग्रामीण क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने श्री गणेश गोवे आयोजित क्रिकेट सामन्यात श्री सोमजाई गोवे संघ अंतिम विजेता ठरला. सोमजाई गोवे व हेटवणे यांच्यात झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात अखेर श्री सोमजाई संघाने बाजी मारत प्रथम क्रमांक पटकावला तर जय बजरंग हेटवणे संघाला द्वितीय क्रमांकावर समाधान मानावे लागले. श्री क्षेत्रपाल पुई संघ तृतीय तर श्री सोमजाई तिसे संघ चतुर्थ क्रमांकाचा मानकरी ठरला. उत्कृष्ट सामनावीर सोमजाई गोवे संघाचा निखिल वाफिलकर तर स्पर्धेतील उकृष्ट गोलंदाज हेटवणे संघाचा अक्षय तेलंगे तर उत्कृष्ट फलंदाज म्हणून गोवे संघाचा सागर जाधव यांना गौरविण्यात आले.



गणेश गोवे यांच्या वतीने रविवार दि.३० जानेवारी रोजी आयोजित केलेल्या स्पर्धांचे उद्‌घाटन गोवे खांब ग्रामीण क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष प्रविण धामणसे यांच्या हस्ते करण्यात आले. सदरच्या स्पर्धेला नितीन जाधव, पांडुरंग जाधव, लिलाधर दहिंबेकर, जयशिंग पवार, नंदकुमार वाफिलकर, रविंद्र जाधव, श्रीधर गुजर, महेंद्र जाधव, महादेव जाधव, नितीन वारकर, सुरेश जाधव, अरुण दहिंबेकर, आप्पा जाधव, अरुण पवार, शिवराम जाधव, रुपेश जाधव, अविनाश आंबेकर, धनेश घरट, बारक्या सुर्वे, उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हरिचंद्र गुजर, अजित दहिंबेकर, प्रशांत गुजर, निखिल दहिंबेकर, निलेश दहिंबेकर, अविनाश दहिंबेकर, अशोक दहिंबेकर, विनय दहिंबेकर, सार्थक दहिंबेकर, रुपेश पवार, शरद वारकर, सहेंद्र पवार, सत्कार कापसे, सुजित पवार, प्रल्हाद कापसे, मयूर जाधव, हर्षद जाधव, आकाश दहिंबेकर,राकेश मांजरे, साहिल दहिंबेकर, प्रमोद वारकर, पदाधिकारी युवक व सर्व सदस्य यांनी अथक परिश्रम घेतले.

## बोरखार प्रीमियर क्रिकेट स्पर्धेत
# रियांश इलेव्हन संघाने मारली बाजी

। उरण । वार्ताहर ।

बोरखार येथील गावदेवी क्रिकेट संघाच्यावतीने बोरखार प्रीमियर क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते सदर स्पर्धेचे उदघाटन विंधणे ग्रामपंचायतीचे सुरेश डाकी यांच्या हस्ते झाले. यावेळी बोरखार गावचे रोशन डाकी, भारत डाकी, दिपाली म्हसकर, विनायक पाटील, कान्हा ठाकूर आदी उपस्थित होते,

या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला तो रियांश इलेव्हन तर द्वितीय क्रमांकाचा मानकरी ठरला आयुशी इलेव्हन संघ, स्पर्धेत पंचाची भूमिका पार पाडली ती



सोमनाथ ठाकूर, विशाल डाकी सुशांत डाकी, विघ्नेश डाकी यांनी तर समालोचकाची जबाबदारी जीवन डाकी, सतिश गावंड, वैभव डाकी, मोहन ठाकूर,विकास तांडेल यांनी पार पाडली. या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट गोलंदाज ठरला देवेंद्र डाकी तर उत्कृष्ट फलंदाज ठरला तो रियांश इलेव्हनचा सोमनाथ ठाकूर तर मालिकावीरचा मानकरी सज्जन मोकल तर यावेळी घेण्यात आलेल्या ४० प्लस क्रिकेटमध्ये प्रथम क्रमांक मिळवला तो सुनील ठाकूर यांच्या टी एम सी सी संघ. सदर स्पर्धेच्या पारितोषिक वितरण लहुकुमार डाकी, रोशन डाकी, अरुण डाकी, नागराज डाकी, मच्छिंद्र ठाकूर, निलेश गावंड, राजाराम डाकी, ॲड. जिविका गावंड ग्रामस्थ क्रिकेट प्रेमी उपस्थित होते.

# भारत ऑस्ट्रेलियात रंगणार उपांत्य फेरीचा सामना

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

१९ वर्षांखालील विश्वचषकाचा दुसरा उपांत्य सामना बुधवार २ फेब्रुवारी रोजी ॲंटिग्वा येथील कूलिज क्रिकेट मैदानावर भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात होणार आहे. बांगलादेशचा पराभव करून भारताने तर पाकिस्तानचा पराभव करत ऑस्ट्रेलियाने उपांत्य फेरीत प्रवेश केला.

भारताने दहाव्यांदा उपांत्य फेरी गाठली. स्पर्धेतील सराव सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा पराभव केला. अंडर-१९ वर्ल्ड कपमध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात आतापर्यंत ७ वेळा सामना झाला आहे. यापैकी भारताने ५ सामने जिंकले आहेत. तर ऑस्ट्रेलियाचा संघ २ सामने जिंकू शकला आहे. २००० ते २०२० या दोन संघांमधील शेवटच्या ५ सामन्यांवर नजर टाकली तर प्रत्येक वेळी टीम इंडियाने विजय मिळवला आहे. अशा स्थितीत पुन्हा भारताचे पारडे जड आहे.



# क्रिकेटचा महासंग्राम स्पर्धेतून दिला एकतेचा संदेश



। पाली /गोमाशी । वार्ताहर ।

सुधागड तालुक्यातील भैरवनाथ क्रिकेट क्लब आडुळसे येथे ओपन अंडरआर्म क्रिकेट महासंग्राम २९, ३० जानेवारी रोजी गावातील तरुण मंडळ, ठाणे, मुंबई, पुणे तरुण मंडळ यांनी एकत्रित येऊन गावात एकीची भावना निर्माण व्हावी या दृष्टिकोनातून सदर सामने आयोजित केले होते.

या स्पर्धेत जिल्ह्यातील नामवंत ६४ संघाने आपला प्रवेश नोंदविला होता. या स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी तालुक्यातील क्रीडा प्रेमींनी हजेरी लावली होती. या स्पर्धेतील अंतिम लढत खवली आणि नेणवली या दोन संघात झाली. या अंतिम सामन्यात खवली या संघाने भैरवनाथ क्रिकेट अडुळसे चषकावर आपले नाव कोरले. या संघास रोख रक्कम सात हजार रुपये व आकर्षक चषक, उपविजेता नेणवली संघ पाच हजार रुपये व आकर्षक चषक तर तृतीय क्रमांक बाप्पा इलेव्हन ठाणे या संघास तीन हजार रुपये व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेतील उत्कृष्ट फलंदाज अर्पित मोरे नेणवली या खेळाडूंला आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेच्या बक्षीस वितरण दत्ताभाऊ पोंगडे, तसेच मंडळाचे पदाधिकारी आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# सोशल मीडियावर हिंदुस्थानी भाऊचा ट्रेंड

वर्षा मेहता

। अलिबाग ।

१० वी आणि १२ वीच्या बोर्डाच्या परीक्षेच्या पद्धतीवरून अनेक विद्यार्थ्यांनी धारावीच्या रस्त्यावर निदर्शने केली. विकास फटक उर्फ हिंदुस्थानी भाऊच्या चिथावणीखोर व्हिडीओनंतर हे कृत्य करण्यात आल्याचे समजते. प्रसिद्ध यूट्यूबर हिंदुस्तानी भाऊ यांनी ऑफलाइन परीक्षेच्या मुद्द्यावरून १०वी आणि १२वीच्या विद्यार्थ्यांच्या चिंतेवर आवाज उठवला.

SOCIAL MEDIA पडसाद

व्हिडीओमध्ये ते म्हणाले की, लहान मुलांशी केलेले दुष्कृत्य करू नये, उद्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घ्या. तसे न झाल्यास मी आणि माझे विद्यार्थी वर्षा गायकवाड यांच्या दारात आंदोलन करू. जोपर्यंत त्यांना न्याय मिळत नाही तोपर्यंत करू, नंतर त्याने असेही नमूद केले की तो तुरुंगवास आणि परिणामांना सामोरे जाण्यास सक्षम आहे, परंतु लक्ष देण्याची



आणि परीक्षेची विद्यार्थ्यांची चिंता दूर करण्याची विनंती करतो.

हा व्हिडिओ प्रसारित झाल्यापासून विद्यार्थ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. कोव्हिड परिस्थितीत बोर्ड परीक्षा रद्द करण्याबाबत फलक आणि नारे घेऊन अनेक विद्यार्थी धारावी येथे जमले. त्यामुळे सोशल मीडियावर अनेकांनी त्याच्यावर टीका केली. हिंदुस्थानी भाऊचे इंस्टाग्रामवर १ दशलक्षाहून अधिक फॉलोअर्स आहेत, आणि महाराष्ट्रातील ऑनलाइन बोर्ड परीक्षा इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निषेधादरम्यान ते ट्रेंड करत आहेत. त्यांनी पुढाकार घेतला आहे.

# भेंडखळ क्रिकेट ॲकॅडमीची फायनलमध्ये धडक

। उरण । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील पोयनाड येथे चौदा वर्षाच्या खालील मुलांच्या खुल्या ४० ओव्हर क्रिकेट स्पर्धेत ३० जानेवारी रोजी झालेल्या सेमी फायनलमध्ये UCS उरण संघाचा दणदणीत पराभव करून भेंडखळ क्रिकेट अकॅडमीने फायनलमध्ये धडक मारली आहे. भेंडखळ संघाच्या निर्जर पाटील याने ८५ धावांची तंत्रशुद्ध खेळी केली. तर स्मित म्हात्रे यांनी तीन बळी घेतले. धीरज ठाकूर यांनी शेवटच्या ओव्हरमध्ये चांगली फलंदाजी केली.



या संघाच्या कामगिरी बद्दल भेंडखळ क्रिकेट अकॅडमीचे सर्व खेळाडूचे अध्यक्ष संदिप पाटील, मनोज भगत, कोच नयन कट्टा, शरद म्हात्रे, विशाल ठाकूर यांचे कौतुक होत आहे.

# श्रीजेश वर्षांतील सर्वोत्तम क्रीडापटू

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय हॉकी संघाचा अनुभवी गोलरक्षक पीआर श्रीजेश यंदाच्या जागतिक क्रीडा स्पर्धांमधील २०२१ वर्षांतील सर्वोत्तम खेळाडूच्या पुरस्काराचा मानकरी ठरला आहे. हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जिंकणारा तो केवळ दुसरा भारतीय क्रीडापटू आहे. २०२० मध्ये भारतीय महिला हॉकी संघाची कर्णधार राणी रामपालने हा पुरस्कार पटकावला होता.

## प्रो लीग हॉकी स्पर्धेत
# भारतीय महिलांकडून चीनचा धुव्वा

। मस्कत । वृत्तसंस्था ।

भारतीय महिला संघाने सोमवारी 'एफआयएच' प्रो लीग हॉकीमध्ये विजयी पदार्पण करताना सलामीच्या लढतीत चीनचा ७-१ असा धुव्वा उडवला. यंदा मस्कत (ओमान) येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रो लीग हॉकी स्पर्धेचे हे तिसरे वर्ष असून भारतीय महिला संघाला प्रथमच यामध्ये खेळण्याची संधी लाभत आहे. त्यांनी चीनविरुद्धच्या सामन्याला आक्रमक सुरुवात केली.



पाचव्या मिनिटाला नवनीत कौरने गोल करत भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिली. १२ व्या मिनिटाला नेहाच्या गोलमुळे भारताची आघाडी दुप्पट झाली. उत्तरार्धात भारताच्या आक्रमणाला अधिकच धार आली.

४० व्या मिनिटाला अनुभवी वंदना कटारियाने भारताचा तिसरा गोल केला. त्यानंतर चीनने ४३ व्या मिनिटाला सामन्यातील एकमेव गोल नोंदवला. मग शर्मिला देवीने सलग दोन मिनिटांत दोन गोल झळकावत भारताला ५-१ अशी आघाडी मिळवून दिली. अखेर ५० व्या मिनिटाला गरुजत कौर, तर ५२व्या मिनिटाला सुशिलाने गोल झळकावल्याने भारताने हा सामना ७-१ असा फरकाने जिंकला. उभय संघांत मंगळवारी सलग दुसरा सामना खेळवला जाणार आहे.


कृषीवल

## क्रीडा संघटनांना आवाहन

रायगड जिल्ह्यात विविध क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जात आहेत. त्यामुळे क्रीडाक्षेत्रात नैपुण्य मिळविण्याची संधी खेळाडूंना मिळत आहे. त्यामधून क्रीडापटू तयार व्हावेत आणि त्यांना यथायोग्य प्रसिद्धी लाभावी यासाठी कृषीवलतर्फे सर्वच क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाची तसेच स्पर्धा झाल्यानंतरचे वृत्त कृषीवलमध्ये विनामुल्य प्रसिद्ध केले जाणार आहे. यासाठी सर्व क्रीडा संघटना,आयोजकांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धांची सविस्तर माहिती, स्पर्धेचे उद्‌घाटन,स्पर्धेचे बक्षिस वितरण आदींची माहिती कृषीवलकडे krushivalnews@gmail.com या मेलवर पाठवावी.त्यास तातडीने प्रसिद्धी दिली जाईल.

**स्पर्धेसाठी माध्यम प्रायोजकबाबत कृषीवल कार्यालयाशी संपर्क साधावा.**

- मुख्य संपादक








हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या भगवद्गीतेचे महत्त्व भावी पिढीलाही ज्ञात व्हावे, हा उदात्त दृष्टिकोन समोर ठेवून इस्कॉन 'हरे कृष्ण' नामहट, अलिबाग केंद्रातर्फे विद्यार्थी तसेच खुल्या गटासाठी भगवद्गीता पाठांतर स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा विनामूल्य असून, विजयी होणाऱ्यांना रोख बक्षिसेही दिली जाणार आहेत.

विद्यार्थी गट- ५ वी ते १० वी,
खुला गट- ११ वी ते पुढे (मुला/मुलींसाठी)
दैनिक कृषीवलमध्ये दररोज छापून येणाऱ्या भगवद्गीतेतील प्रत्येक अध्यायानंतर १० प्रश्न विचारले जातील. त्याची उत्तरे दोन्ही गटांनी द्यायची आहेत. प्रत्येक गटासाठी पुढीलप्रमाणे बक्षिसे दिली जातील.
*(प्रथम क्रमांक ५ हजार रुपये, द्वितीय ३ हजार रुपये, तृतीय २ हजार रुपये, उत्तेजनार्थ १ हजार रुपये)*
अधिक माहितीसाठी तसेच प्रश्नाची उत्तरे सादर करण्यासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**श्री. गुरुनाथ बळीराम नाईक, पत्ता- संत रोहिदास नगर, 'वृंदावन' घर क्र. ७२, चेंढरे कावेरी बिल्डींग समोर ९४२३०९१०८१**
**पाठांतर केलेले श्लोक सादर करण्याची वेळ व ठिकाण वेळोवेळी जाहीर केले जाईल.**


कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2021)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : इब्राहीम अफगाण* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)